30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 3/28/2026 8:23 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ अंक : ११ सोमवार दि. ३० मार्च २०२६ ते रविवार दि. ०५ एप्रिल २०२६ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## दारूच्या पार्टीत वाद झाला पिंटू याने शुभमचा खून केला

नालासोपारा : क्राईम रिपोर्टर

दारूच्या पार्टीत पिणाऱ्यांना नशा झाली कि कुठल्या ना कुठल्या कारणावरून त्यांच्यात वाद होतात आणि या वादात एखाद्याचा जीवही जातो. कारण काहींच्या डोक्यात नशा गेली कि त्यांना समोरच्याला टोचून बोलायची किंवा त्याचा अपमान करायची सवय असते, त्यावरूनच वाद होतात. नालासोपाऱ्यात असेच घडले. शुभम तिवारी आणि पिंटू ठाकूर हे दारू पीत बसले होते. यावेळी दोघेही नशेत होते आणि नशेत असतानाच त्यांच्यात शुल्लक ...पान २ वर

## निर्दयी बापाने उलटे टांगून मारताच मुलींनी हंबरडा फोडला एक वाचली दुसरीने पाण्यावाचून तडफडून जीव सोडला









सांगली : क्राईम रिपोर्टर

**माणसाची गरिबी आणि गरिबीत जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष यामुळे माणूस दिवसेंदिवस चिडचिडा बनतोय. त्याला छोट्या छोट्या गोष्टीचा राग येतोय आणि रागाच्या भरात त्याच्या हातून कोणतीही भयंकर  घटना घडते. वास्तविक आईवडिलांचे मुलांवर खूप प्रेम असते. मुलांचे भविष्य   ते काबाडकष्ट करीत असतात. आपल्या मुलांनी चांगले शिकावे त्यांना चांगली नोकरी मिळावी जेणेकरून भविष्यात त्यांना त्यांच्या पायावर उभे राहता यावे हीच प्रत्येक आई वडिलांची इच्छा असते. पण काही आई वडील मात्र गरिबीने इतके त्रासलेले असतात कि परिस्थितीचा राग ते मुलांवर काढतात. अशावेळी मुलांनी काही चूक केली तर मुलांना भयंकर शिक्षा द्यायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. शिवाय बाप जर दारुडा असेल तर तो दुसऱ्याचा रागही मुलांवर काढतो. मुलांना बेदम मारहाण करतो. दुसरे महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अजूनही मुलगा आणि मुलगी असा भेदभाव केला जात असल्याने मुलींबाबत बापाचे मत फारसे चांगले नसते. कित्येक कुटुंबात मुलींना बापाकडून प्रेम आणि चांगली वागणूक मिळत नाही अशातच जर मुलीनी काही चूक केली तर तिची खैर नाही. बाप मुलीचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही. सांगलीच्या आटपाडीमध्ये अशीच एक भयंकर घटना घडली आहे. मुलीनी शेजाऱ्याचे पैसे चोरल्याच्या आरोपामुळे बाप इतका चिडला कि त्याने दोन्ही लहान मुलींना उलटे टांगून बेदम मारहाण केली. उलट्या टांगलेल्या मुली पाणी मागत होत्या, पण त्यांना पाणीही दिले नाही. त्यामुळे पाण्यावाचून एका मुलीचा तडफडून मृत्यू झाला, तर एक जखमी असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेने संपूर्ण सांगली जिल्ह्यात खळबळ माजली असून आरोपी बापाला पोलिसांनी अटक केली आहे.**

आटपाडी पासून जवळच बनपुरी बाळेवाडी रस्त्यावर यमगर वस्ती आहे.या ठिकाणी दादु हैबत यमगर आणि त्याची पत्नी राणी, आई वडिल आणि चार मुली राहयला आहेत. दादु यांची यमगर वस्तीत शेती असली तरी ते आणि त्याची पत्नी राणी या मोलमजुरी करून आपल्या संसाराचा गाडा चालवित असत. दादु यांचे वयोवृध्द आई वडिल हे घरची शेती बघत होते. शेतातच घर असल्याने ते एकत्रच राहयला आहेत. बनपुरी हे आटपाडी पासून पश्चिमेला वीस किमी अंतरावर असल्याने येथील लोकांची ये जा ही कायम आटपाडी शहरात होत असतो. दादु आणि त्याची पत्नी राणी हे दोघेजण घरची परिस्थीती बेताची आणि गरिबीची असल्याने मिळेल तेथे रोजगारासाठी जात होते. यमगर वस्तीत त्याच्याच समाजाचे जातीचे लोक आणि भाऊबंद राहयला असल्याने एकमेकांच्या घरी येणे जाणे हे योगाने होत होते. दादु यांची मोठी मुलगी वर्षा (वय १३), अनुजा (वय ११) सानिका (वय १०) आणि दोन मुले माही (वय ८) आणि पृथ्वीराज (वय ७) ही मुले आणि मुली बनपुरी येथील शाळेत सकाळी १० वाजता गेले की, संध्याकाळी ६ वाजताच घरी परतत होते. त्याची मुले मुली हे यमगर वस्तीतील आपल्या समवयस्क मुलांच्या बरोबर खेळत असल्याने त्या ही शेजारच्या घरात हसत खेळत जात येत होते. सगळे काही व्यवस्थीत चालू होते. दादु याचा स्वभाव हा स्वाभिमानी आणि प्रमाणीक असा असल्याने त्यांना कुणी त्याच्या विषयी वावगे बोलले खपत नव्हते. त्याच्या या स्वभावामुळे त्याचे कधी कोणाच्या घरात येणे जाणे ही ...पान २ वर

## प्रेयसीचे त्याने जराही नाही एकले रागाच्या भरात तिला मारून टाकले

नाशिक : क्राईम रिपोर्टर



**काही मुली खूप साध्या सरळ आणि मोकळ्या स्वभावाच्या असतात. त्यामुळे त्या सर्वांशी हसून खेळून राहत असतात. पण त्यांच्या जवळच्यांना त्यांचा हा स्वभाव आवडत नसतो. खास करून अशा मुलीचा जो प्रियकर असतो त्याला आपल्या प्रेयसीचा हा स्वभाव अजिबात आवडत नाही. सिंदखेड राजा येथील अथर्व आणि संस्कृती यांचे प्रेम होते. पण संस्कृती मोकळ्या मनाची असल्याने ती कुणाशीही बोलायची गप्पा मारायची. अथर्व याच गोष्टीमुळे तिच्यावर चिडून होता आणि एके दिवशी याच कारणाने तिच्याशी भांडण करून त्याने रागाच्या भरात तिचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.**




बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा याठिकाणी रहाणारे देशमुख आणि काळे या दोन्ही कुटुंबाचे एकमेकांशी मित्रत्वाचे संबंध आहेत. या कुटुंबातील गजाननराव देशमुख आणि सतिश काळे हे एकमेकांचे मित्र आहेत. या दोघांची किशोरवयीन मुलेही एकमेकांना ओळखत असून त्यांच्यामध्येही मित्रत्वाचे संबंध आहेत. दोन्ही कुटुंबे सुखवस्तू असून एकमेकांशी घरोब्याचे संबंध आहेत. गजाननराव देशमुख (रा. दुसरंबीड, सिंदखेडराजा, जि. बुलढाणा) यांचा १९ वर्षाचा मुलगा अथर्व हा नाशिक येथे अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याच्याजवळ स्वतःची डस्टर कार आहे. सतिश काळे यांची मुलगी संस्कृती ही १६ वर्षाची आहे. संस्कृती ही अकोला येथे शिक्षण घेते. लहानपणापासून एकमेकांना ओळखत असलेले अथर्व आणि संस्कृती आता मोठे झाले होते. त्यांनी तारूण्यात प्रवेश केला होता. दोघांच्याही मनात आता एकमेकांविषयी आकर्षण निर्माण झाले होते. दोन्ही घरे तोला-मोलाची असल्याने आपल्या प्रेमात आडकाठी येणार नाही याची त्यांना खात्री होती म्हणून त्यांनी आपली मैत्री ...पान २ वर

## संशयाने उद्ध्वस्त केला सुखी संसार चिडलेल्या पतीने पत्नीला केले ठार




पुणे : क्राईम रिपोर्टर

**पती पत्नीच्या सुखी संसारात संशयाच्या भुताने प्रवेश केला की माणूस कितीही हुशार आणि सुसंस्कृत असला तरी तो मानसिक स्वास्थ हरवून बसतो. पुण्यातील बिबवेवाडी मधील अशाच एका घटनेत संशयाने पछाडलेल्या एका इसमाने त्याच्या पत्नीला इतकी बेदम मारहाण केली की त्यातच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी बिबवेवाडी पोलीसांनी आरोपीला अटक केलेली आहे.**

संशयाचं भूत कोणत्या टोकापर्यंत जाऊ शकतं याचं प्रत्यक्ष उदाहरण पुण्यामध्ये घडलंय. चरित्र्यावरील संशयावरून पतीने आपल्या पत्नीला एवढी जबर मारहाण केली की पत्नीला तिचा जीव गमवावा लागला आहे. ही धक्कादायक घटना घडली आहे शहरातील अप्पर इंदिरानगर परिसरात. २४ मार्च रोजी दुपारी चारच्या ...पान २ वर

## हत्या नव्हे ती कुत्र्यांच्या हल्ल्यात मेली 'अफवे'मुळे पुणेकरांची फजिती झाली

पुणे : क्राईम रिपोर्टर

**'पुणे तिथे काय उणे' असे म्हणतात ते काय खोटे नाही. कारण पुण्यात वेगवेगळ्या घटना घडतात. तसेच घडवल्याही जातात. अशा घटना घडवणारे लोक पुण्यात आहेत. अशीच एक घटना चाकणमध्ये समोर आली आहे. चाकणमध्ये एका महिलेलावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला करून ठार मारले, पण पुणेकरांनी मात्र तिच्यावर बलात्कार करून हत्या केल्याची अफवा पसरवली.**




पुण्यातील चाकण परिसरात एका महिलेता मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे महिलेच्या शरीरावर कपडे नव्हते. शिवाय शरीरावर अनेक जखमा देखील होत्या. मृतदेहाची अवस्था पाहिल्यानंतर अनेकांना वाटलं की, महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. त्यानंतर तेथील लोकांनी तात्काळ याबद्दल पोलिसांना महिलेवर बलात्कार झाल्याची माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला. पण तपासात समोर आलेल्या माहितीनुसार महिलाचा बलात्कार आणि हत्या झालीच नव्हती. प्रकरण काही वेगळंच होतं. पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले तेव्हा, धक्कादायक सत्य समोर आलं. महिलेवर बलात्कार झाला नव्हता आणि तिची हत्या देखील करण्यात आली नव्हती, तर महिलेवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केलेला सीसीटीव्ही फुटेजनुसार, महिलेवर जळपास ६ ते ७ भटक्या कुत्र्यांनी एकत्र हल्ला केला. ज्यामुळे महिला गंभीर जखमी झालेली कुत्र्यांच्या ...पान २ वर

## एकतर्फी प्रेमाचा भयंकर शेवट झाला मुलीच्या भावाचा नाहक बळी गेला

जळगाव : क्राईम रिपोर्टर






**आजकाल किशोरवयीन मुलांच्या मनात शालेय जीवनापासूनच प्रेमाची ओढ निर्माण होते. त्यामुळे एखादी मुलगी त्यांना आवडली कि मुलं तिच्या प्रेमात पडतात. मात्र तिने नकार दिला तरीही तिच्या मागे लागतात. पण अशा एकतर्फी प्रेमातून काहीही साध्य होत नाही, उलट मुलाच्या आणि मुलीच्या कुटुंबामध्ये दुष्मनी निर्माण होते आणि त्यातून काहीही घडू शकते. यावल तालुक्यातील एका गावात गौरव नावाच्या अल्पवयीन मुलाचे त्याच गावातील एका अल्पवयीन मुलीवर एकतर्फी प्रेम होते. पण तिने त्याला नकार दिला होता. मात्र मुलीने हा प्रकार घरी सांगताच दोन्ही कुटुंबात वादावादी सुरु झाली. याच वादातून झालेल्या राड्यात एकतर्फी प्रेमकरणाऱ्या प्रेमवीराने मुलीच्या भावाला भोसकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

विद्यालयातून कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थी हे कुमारवयीन विद्यार्थी असतात. अशा कुमारवयीन विद्यार्थ्यांना शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात आल्यावर बऱ्यापैकी मोकळीक अर्थात सुट मिळत असते. शालेय जीवनात ...पान २ वर

## स्त्रीलंपट व्याभिचारी अभिनेता वासनेने खूप पेटला शरीरसुखास नकार देताच मोलकरणीचा जीव घेतला

मीरारोड : क्राईम रिपोर्टर



**काही लोक इतके वासनांध असतात की आल्या घरात काम करणाऱ्या गरीब मोलकरणीलाही सोडत नाही. मीरा रोड मध्ये अशाच एका घटनेत मोलकरणीला शरीर सुख देण्यास नकार दिला म्हणून एका अभिनेत्याने तिची हत्या केली. या प्रकरणी मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

मिरा रोडच्या सिल्वर पार्क येथील एका इमारतीत बुधवारी रात्री ३७ वर्षीय विवाहितेची चाकूने वार करत हत्या करण्यात आली. ही महिला घरकाम करत असलेल्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये तिची हत्या करण्यात आली. टीव्ही अभिनेता आशिष मेश्राम याने महिलेचा खून केल्याचा आरोप आहे. हत्येनंतर पळून गेलेल्या आरोपीला मिरा रोड पोलिसांकडून शुक्रवारी विशाखापट्टणम येथून अटक करण्यात आली आहे. लैंगिक सुखाची मागणी धुडकावल्याने आशिषने तिचा जीव घेतल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. काशिमिरा येथे वास्तव्यास असलेल्या सुमन कांबळे या सिल्वर पार्क येथील 'चंद्रेश आर्केड' इमारतीत गेल्या काही महिन्यांपासून घरकाम करत होत्या. बुधवारी सायंकाळी त्या नेहमीप्रमाणे कामासाठी गेल्या होत्या. यावेळी घरकाम करत असलेल्या घराच्या दरवाजातच त्या गंभीर जखमी अवस्थेत असल्याचे शेजारी राहणाऱ्या महिलेला दिसून आले. त्यांनी इतर नागरिकांना बोलावून, त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र त्यापूर्वीच सुमन यांचा मृत्यू झाला होताहल्ला झाला, त्यावेळी त्या एकट्याच घरात होत्या. त्यांच्या मान, छाती आणि पोटावर सपासप वार करण्यात आले. ...पान २ वर

## दिराचा अखेर शेवट करण्याचे ठरले वहिनी व पुतण्याने गळा दाबून मारले




अकोला : क्राईम रिपोर्टर

**आजकाल कौटुंबिक वाद कोणत्या थराला जातील याचा नेम नाही. कारण अशा वादातून कुटुंबातील लोक एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. अकोला जिल्ह्यातील वाई गावात शुल्लक वादातून वहिनीने आपल्या मुलाच्या मदतीने दिराची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.**

अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील वाई (माना) येथे घडलेल्या एका खळबळजनक घटनेत, कौटुंबिक वादातून सख्ख्या वहिनीने आणि पुतण्याने मिळून काका ची गळा आवळून हत्या केल्याचं समोर आलं आहे. माना पोलिसांनी अत्यंत कौशल्याने तपासचक्र फिरवत अवघ्या काही तासांत या हत्येचा उलगडा केला असून दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. २६ मार्च रोजी सकाळी वाई (माना) येथील तक्रारदार गोपाल ...पान २ वर

## संशयी पतीचे डोकेच फिरले पत्नीला दगडाने ठेचून मारले

बैलहोंगल (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर

**पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणारा पती मानसिक स्वस्थ हरवून बसलेला असतो. कारण त्याचे सतत आपली पत्नी कुठे जाते कोणाशी बोलते याकडेच लक्ष असते आणि त्याच टेन्शनमध्ये त्याला दारूचे व्यसन लागते. दारू प्यायल्यावर त्याच्या मनात पत्नीविषयी अधिकच चीड निर्माण होते. गोवनकोप्पला येथील बसवराज याची पत्नी शिवाक्काच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातून तो रोज तिला मारहाण करायचा. एकदा त्याला समजवण्यासाठी सासरे आणि मेव्हणा आला. पण सासऱ्यालाही त्याने मारहाण केली. यावेळी पत्नी शिवाक्का मध्ये पडली असता बसवराज  याने तिच्या डोक्यात मोठा दगड घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



बेळगावी जिल्हयातील बैलहोंगल तालुक्यातील गोवनकोप्पला येथे बसवराज जोडहळ्ळी हा पत्नी शिवक्का आणि दोन मुले आणि एका मुलीसह राहयला आहे. गेल्या दहा वर्षापूर्वी त्यांनी प्रेम विवाह केला असल्याने दोघांचा संसार तसा सुखी समाधानाने चालला होता. गावात काही काम धंदा नसल्याने बसवराज हा कामानिमित्त बंगळुरू येथे गेला होता. बसवराज मजुरीला जात असल्याने त्याच्या सोबत शिवाक्का ही मजुरीसाठी जाऊ लागली. ...पान ६ वर

30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/28/2026 8:24 PM Page 1



पान १ वरून....

## दारूच्या पार्टीत वाद झाला...

कारणावरून वाद झाला. या वादात चिडलेल्या पिंटूने शुभंमवर चाकूचे वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

वसई विरार शहरात एकापाठोपाठ एक अशा हत्यांचे सत्र सुरूच आहे. मंगळवारी रात्री उशिरा दारू पिल्यानंतर दोन तरुणांमध्ये वाद झाला. याच वादातून एका तरुणाने दुसऱ्या तरुणावर चाकूने वार करून हत्या केल्याची घटना घडली आहे. शुभम तिवारी (३०) असे या मयत तरुणाचे नाव आहे. मयत शुभम तिवारी (३०) हा नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथील जिजाई नगरमध्ये मंगळवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास तो आपल्या मित्र पिंटू ठाकूर याच्यासोबत मद्यपान करत होता. दरम्यान, दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादातून संतापलेल्या पिंटू ठाकूरने शुभमच्या डोक्यावर व गळ्यावर धारदार शस्त्राने वार केले. यात शुभम गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. हत्येनंतर मित्र पिंटू हा घटनास्थळावरून फरार झाला होता. तुळींज पोलिसांनी पथके नियुक्त करीत तपास सुरू करून अवघ्या काही तासातच आरोपी पिंटू ठाकूर याला नालासोपाऱ्यातून अटक केली आहे. ठाकूर विरोधात तुळींज पोलीस ठाण्यात विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. यापूर्वी शुभम मिश्रा या तरुणाची सुद्धा मद्यपान करताना झालेल्या वादातून नालासोपारा पश्चिमेच्या पुलाजवळ दगडाने ठेचून हत्या करण्यात आली होती. शहरात सातत्याने अशा हत्यांच्या घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## निर्दयी बापाने उलटे टांगून मारताच ...

नव्हते. खरे तर त्याचा स्वभाव हा तसाच होता. आपल्या या स्वभाव गुण धर्मामुळे त्यांनी आपल्या मुलांच्यावर ही वचक ठेवलेला होता. त्यांची मुले त्यांना घाबरत होती. आपल्या मुलांनी आपल्या इच्छेविरूध्द वागु नये त्यांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे अशी त्याची माफक इच्छा होती. त्यासाठी नवरा बायको रात्र दिवस राब राबत होते. दिवस रात्र ते मेहनत करत होते. परंतु मुले ही मुलेच असतात. त्याचे खेळण्या बागडण्याचे दिवस असल्याने ती आपल्या संवगडयाबरोबर खेळयला जात होते. अनुजा आणि सानिका या दोघी आपल्या घराशेजारील घरात खेळायला जात होत्या. घराशेजारी यमगर कुटूंबाची भावकीच राहत असल्याने त्या दोघी खेळायला आल्या तरी शेजारी कुणी काही त्यांना बोलत नव्हते. बुधवार दिनांक २५ मार्च २०२६ रोजी शाळेतून घरी आल्यानंतर अनुजा आणि सानिका या दोघी शेजारी खेळायला गेल्या. त्याचे आई वडिल ही दिवसभर कामावर गेले असल्याने घरात आजी आजोबा आणि त्याची इतर भांवडे होती. संध्याकाळी उशिरा अनुजा आणि सानिका या दोघी शेजारच्या घरातून खेळून परत आपल्या घरी आल्या. तो पर्यंत दादु आणि राणी हे ही घराकडे कामावरून परत आले. दादु घरात नेहमीप्रमाणे त्यावेळी आराम करीत असताना शेजारची बाई ओरडतच त्याच्या घरी आली. त्या बाईने दादु यांना तुमच्या मुलीने माझ्या घरातील सोन्याची एक वस्तु आणि पर्स चोरून आणली आहे असे सांगत त्या दोघींच्यावर तिने चोरीचा ओरप केला. आपल्या मुलीवर भावकीतील बाईने चोरीचा आरोप केल्याने दादु यांनी अनुजा आणि सानिका या दोघींना बाजुला घेऊन खडसावून विचारले की तुम्ही त्याच्या घरातून काय आणले आहे का? दोघींनी ही मम्मी पप्पा आम्ही काहीच आणले नाही.आम्ही चोरी केली नाही असे रडत रडत आपल्या आई वडिलांना सांगितले. त्यावेळी दादु आणि राणी यांनी त्या बाईला सांगितले की, आमच्या मुलीनी चोरी केली नाही, त्या तश्या नाहीत, तुमची वस्तु आणि पर्स तुम्ही तुमच्या घरात कुठे विसरलात का? ते आधी बघा. परंतु ती बाई काही ऐकायलाच तयार नव्हती. तुमच्या अनुजाने आणि सानिकानेच माझ्या घरात चोरी केली आहे. त्या दोघी ही उशिरा पर्यत आमच्या घरी खेळत होत्या. त्यांनीच जाणून बजून माझ्या घरात चोरी केली आहे. असे म्हणत त्या बाईने दादु आणि राणी म्हणजे सानिका आणि अनुजाच्या आई वडिलांना नको नको ते बोल सुनावले. ती भांडता भांडता त्यांना म्हणाली. तुम्हीच नवरा बायकोनी तुमच्या मुलींना वळण लावले नाही.तुम्हीच त्यांना चोरी करायला सांगितले असेल म्हणत माझी वस्तु आणि पैसे मला परत मिळाले नाही तर मी तुमच्या मुलीच्या विषयी पोलीसात तक्रार दाखल करेन अशी धमकी दिली. दरवाज्यात राहून त्या बाईने नवरा बायकोला नको नको बोलले होते याचा राग दादु यांना आला होता.आपल्या मुलीच्या मुळे आपल्याला भावकीतील बाईची बोलणी खावी लागली याची खंत त्यांना वाटू लागली. त्यांनी भावकीतील बाईची समजुत काढून तिला परत पाठविले परंतु तिने दिलेली धमकी त्याच्या जिव्हारी लागलेली होती. त्यांना खरे तर काय समजत नव्हते. ती बाई इतकी बोलून सांगत असल्याने खरेच आपल्या मुलीनी त्याच्या घरात चोरी केली की काय अशी शंका दादु यांना आली. आधीच त्याचा स्वभाव रागीट असल्याने त्यांनी अनुजाला आणि सानिकाला घरातील आतील खोलीत नेले. त्यांनी त्या दोघीचे हातपाय जाड दोरीने बांधले. त्या दोघींना ही त्यांनी घरातील आडयाच्या लोंखडी ॲगलला उलटे बांधले. त्या दोघी रडत ओरडत होत्या. आतील खोलीत फक्त त्याची बायको राणी आणि ते स्वतः होत्या. त्यांनी काठीने त्या दोघींना बदडयला सुरूवात केली. काठीने त्या दोघींना त्यांनी इतकी जबर मारहाण केली की त्या दोघी निळया पिवळ्या पडल्या. त्या दोघींच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा लागल्या होत्या. त्या रडत विव्हळत मम्मी,पप्पा आम्ही चोरी केली नाही असे टाहो फोडून सांगत होत्या. परंतु निर्दयी दादुच्या मनाला जरा ही पाझर फुटला नाही, त्याच्या मनात मघाशी त्या बाईने लावलेले बोल लागले होते. आपल्या मुलींच्या मुळे आपल्याला मान खाली घालावी लागली असेच त्यांना वाटत होते. खरे तर त्या दोघींना मारहाण करून ते ही थकले होते. आपल्या मुलींनी चोरी केल्याचे मान्य केले नसल्याने ते ही हताश झाले होते. बाहेरून त्याची आजी अजोबा दार बडवत होते परंतु काही केल्या दादु यांनी दार उघडले नाही. रात्री उशिरा नवरा बायको टांगलेल्या मुलीच्या खाली आपले अंथरून घालून झोपले. परंतु त्या दोघांना ही आपल्या लहान मुलीची जरा ही किव किंवा दया आली नाही. उलट आपल्यावर चोरीचा आळा लागला आहे ते ही या दोघीच्या मुळे असेच त्यांना वाटत होते. सनिका सारखी पाणी दया मम्मी पप्पा असे म्हणत होती परंतु त्यांनी तिला पाणी ही दिले नाही अखेर दादु यांनी केलेल्या मारहाणीत सनिकाचा मृत्यु झाला. ही गोष्ट रात्री उशिरा नवरा बायकोच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने खोलीतून बाहेर येवून आपल्या आई वडिलांना ही घटना सांगितली. वयोवृध्द वडिलांनी जड अंत:करणांनी दोघींना ही खाली उतरवून घेतले. त्यावेळी दादू यांनी तुम्ही का त्या दोघींना खाली उतरवून घेतले म्हणून आपल्या वयोवृध्द वडिलांच्या मागे कोयता घेऊन लागला. परंतु इतर नातेवाईकांनी त्यांना दादूच्या तावडीतून त्यांना सोडवून घेतले. तो पर्यंत सानिका हिचा मृत्यु झाल्याचे शेजाऱ्यांना आणि इतर नातेवाईकांना ही समजले होते. ही घटना समजल्याने सानिकाचे आत्या मामा मामी हे आले. दादु यांनी आपल्या हट्टी स्वभावाने सानिकाच्या मृत्यु देहावर अंत्यसंस्कार करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या वडिलांनी आणि इतर नातेवाईकांनी त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडला. तोपर्यंत या घटनेतील दुसरी मुलगी अनुजा हिला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले होते. तेथे तिच्यावर उपचार सुरू असताना डॉक्टरांना तिच्या अंगावर जबर मारहाणीचे वळ दिसले म्हणून त्यांना शंका आली. त्यांनी जखमी अनुजाला या बाबत विश्वासात घेऊन विचारणा केली असता तिने रडत रडत डॉक्टरांना सांगितले की, पप्पांनी तिला आणि तिच्या बहिणीला ॲगलला उलटे टांगून काठीने मारहाण केली आहे. हा सगळा प्रकार डॉक्टराच्या लक्षात आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती आटपाडी पोलीसांना दिली. पोलीसांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत या घटनेची माहिती घेतली असता त्यांना समजले की, या घटनेत सानिका हिचा मृत्यु झालेला आहे. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आणि दवाखान्यात उपचार घेत असलेल्या अनुजाचा जबाब घेऊन सानिका दादु यमगर (१०) आणि अनुजा दादु यमगर (११) हिला जबर अमानवी मारहाण केल्यावरून दादु हैबत यमगर (३८) याच्या विरोधात आटपाडी पोलीसात भा.दं.वी. कलम १०३(१) आणि वेगवेगळ्या कलमा खाली गुन्हा दाखल केला. दादु यमगर याला पोलीसांनी आटपाडी येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या दरम्यान पोलीसांनी घटनास्थळावरून गुन्हयात वापरलेली दोरी आणि काठी जप्त केली. या घटनेतील जबर जखमी अनुजा हिची परिस्थिती ही नाजुकच होती. या घटनेचा पुढील तपास आटपाडी पोलीस करीत आहेत.

## हत्या नव्हे ती कुत्र्यांच्या हल्ल्यात मेली...

घोळक्यातून सुटका करून घेता न आल्यामुळे तिचा मृत्यू झाला, त्या कुत्र्यांनी महिलेचे कपडेही फाडून टाकले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, कुत्र्याचा हल्ला सुमारे १५ मिनिटे चालला. या काळात, ती महिला गंभीर जखमी झाली आणि अतिरक्तस्रावामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी सकाळी जेव्हा महिलेता मृतदेह लोकांना दिसला, तेव्हा अनेक चर्चा रंगल्या काहींनी तर बलात्कार आणि हत्या झाल्याचं देखील सांगितलं, त्यानंतर चाकण पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली आणि भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे त्या महिलेचा मृत्यू झाल्याचे फुटेजमधून उघड झाले. घडलेल्या धक्कादायक घटनेनंतर, चाकण, मेदणकरवाडी आणि आसपासच्या परिसरातील रहिवाशांनी प्रशासनाने मोकाट कुत्र्यांना पकडावे अशी मागणी केली आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## प्रेयसीचे त्याने जराही नाही एकले...

प्रेमामध्ये रूपांतरीत केली. एकमेकांपासून दूर राहून शिक्षण घेत असले तरी त्यांचा एकमेकांशी फोनवरून संपर्क होत असे. अधून-मधून सुट्टीच्या दिवशी सिंदखेडराजा येथे गेल्यावर ते एकमेकांच्या भेटी गाठी घेत असत. या प्रेमभावनेने अथर्वच्या मनात पझेसिव्हची भावना जोर धरू लागली होती. संस्कृती ही फक्त आपलीच आहे आणि तिने आपल्याशिवाय इतरांचा विचार करू नये असे त्याला वाटत होते, पण संस्कृती आपल्याशिवाय इतर मुलांशी बोलते, हसत-खेळत गप्पा मारते हे अथर्वला रूचले नव्हते. त्याच्या मनात तिच्याविषयी भावना इतकी तीव्र झाली होती कि त्याने अकोला येथे शिक्षण घेत असलेल्या संस्कृतीला याचा जाब विचारण्यासाठी बुलढाणा येथे बोलावून घेतले. तीही येण्यास तयार झाली. त्यानंतर अथर्व आपली स्वतःची डस्टर कार घेवून दोन मित्रांना सोबत घेवून बुलढाणा येथे गेला. बुलढाण्याला आल्यावर त्याने संस्कृतीला जाब विचारायला सुरूवात केली. 'तू इतर मुलांशी का बोलतेस?' अशी विचारणा करत तिच्याशी भांडण केले आणि रागारागात त्याने तिला मारहाण केली. इतकेच नव्हे तर त्याने सोबत आणलेला चाकू तिच्या मानेवर खुपसून तिचा क्रूरपणे खून केला. संतापात खून तर केलेला होता पण भान आल्यावरं त्याला पुढच्या परिणामाची जाणीव होवू लागली. आता तो गुन्हा लपवण्याचा विचार करू लागला. त्याने संस्कृतीचा मृतदेह आपल्या कारमध्ये ठेवला आणि बुलढाण्याहून वाडीव-हे पोलीस ठाणे हद्दीतील सारूळ शिवारातील निर्जनस्थळी फेकून दिला आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. वाडीव-हे पोलीस ठाणे हद्दीतील सारूळ शिवारात सुधाकर बडगुजर यांचा आर.एम.सी. प्लान्ट आहे. त्या प्लान्टवर प्रथमेश सुनिल जाधव (वय २२) हे सुपरवायझर म्हणून काम पहातात. दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाज़ण्याच्या सुमारास प्रथमेश जाधव प्लान्टवरील फुटलेल्या पाईप लाईनचे काम करत असतांना एक मजूर धावत-पळत त्यांच्याकडे आला. त्याने माहिती दिली की, आपल्या प्लान्टला लागून असलेल्या मोकळ्या जागेत एक मुलगी पडलेली असून ती जखमी आहे. ती माहिती मिळताच ते काही मजुरांसमवेत तेथे धावत गेले. सारुळ शिवारातील गट नं. २५ मधील मोकळ्या गवताळ जागेत बाभळाच्या झाडाखाली काट्याकुट्यात एक २५ वर्षाची मुलगी अर्धनग्न अवस्थेत मृतावस्थेत पडली होती. तिच्या अंगात काळ्या रंगाचा फुलबाहीचा टॉप व फिकट निळ्या रंगाची जीन्स पँट आणि एका पायात सफेद स्पोर्ट शूज घातलेला होता. तिची पँट कंबरेपासून खाली सरकल्याने अर्धनग्न वाटत होती. तिच्या मृतदेहाची बारकाईने पहाणी केली असता तिच्या मानेवर चाकू खुपसलेला आणि तो मानेतच अडकलेला दिसून आला. त्यावरून. हा खून आहे हे स्पष्ट झाले. या घटनेची माहिती प्रथमेश जाधव यांनी वाडीव-हे पोलीस ठाण्याला दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक भगवान मथुरे आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनाम्याचे सोपस्कार पार पाडून मृतदेह पोस्टमार्टमसाठी सिव्हील हॉस्पिटल, नाशिक येथे पाठवला. दरम्यान प्रथमेश जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाडीव-हे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. २६/२०२६ भारतीय न्यायसंहिता १०३(१) कलमाखाली अज्ञात मारेकऱ्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी तपासाला गती दिली.परिसरातील सी.सी.टी. व्ही. फुटेज, मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. याशिवाय या वर्णनाशी मिळती-जुळती कोणी तरूणी बेपत्ता असल्यास नागरिकांनी वाडीव-हे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील सर्व पोलीस ठाण्यांना माहिती कळवून माहिती मिळवण्यात आली. मृतदेहाजवळ संस्कृती नावाचे कि-चेन, पिझ्झाचे बॉक्स, काही खाद्यपदार्थ पोलिसांना मिळून आल्यामुळे ही तरूणी येथे कोणासोबत आली होती का? किंवा तिने येथेच अन्न मागवले होते का? या शक्यतांचा तपास पोलिसांनी केला. पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा खून करून मृतदेह येथे टाकून दिला असावा अशी शक्यताही पोलिसांना वाटत होती. मृतदेह अनोळखी होता, तिचा खून करणाऱ्याचा कोणताही पुरावा मागे नसल्याने पोलिसांनी तांत्रिक सहाय्याने तपास सुरू केला. घटनास्थळी संस्कृती नाव असलेली एक की-चेन मिळाली होती, त्यावरून या मयत मुलीचे नाव संस्कृती असावे असा पोलिसांनी अंदाज बांधला. तसेच आजूबाजूच्या व जिल्ह्याबाहेरील पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बेपत्ता व्यक्तींचा पोलीस तपास करत असता अकोला येथील सिव्हील पोलीस ठाण्यात एका मुलीची मिसींग केस दाखल असल्याचे समजले. तिच्या वर्णनावरून हा मृतदेह तिचाच असावा असा अंदाज बांधत तिच्या घरच्यांशी संपर्क साधला, तेंव्हा तो मृतदेह आपली मुलगी संस्कृतीचा (वय १६) असल्याचे तिचे वडील सतिश काळे यांनी ओळखले. ओळख पटल्यानंतर तपासाला वेग आला आणि पोलीस अथर्व देशमुखपर्यंत येवून पोहोचले. पोलीस तपास करत असतांना संस्कृतीच्या ओळखीतील देशमुख कुटुंबातील अथर्ववर संशय व्यक्त करण्यात आला. त्याची माहिती घेण्यात आली असता तो ठिकाणावर नसल्याचे दिसून आले. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला असता तो सिन्नर, कोपरगाव व नाशिक शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. वाडीव-हे पोलिसांनी नाशिकच्या सातपूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून ही माहिती दिली. सातपूर पोलिसांनी त्याच्या रहात्या ठिकाणी धाव घेतली असता तो पसार झाला होता.मोबाईल लोकेशनच्या आधारे तो सिन्नर परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. एक पथक त्याच्या मागावर होते. काही वेळाने तो द्वारका (नाशिक) परिसरात असल्याची माहिती मिळाल्यावर सातपूर पोलिसांनी भद्रकाली पोलिसांना खबर दिली. वाडीव पोलीस व भद्रकाली पोलीस द्वारकाजवळ दाखल झाले. अथर्व कॅब बुक करून छत्रपती संभाजीनगरमार्गे बुलढाण्याला पळून जाण्याच्या तयारीत असतांना भद्रकाली, सातपूर व वाडीव-हे पोलिसांनी त्याला द्वारका परिसरातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याने दिलेल्या माहितीवरून त्याला मदत करणारा त्यांचा मित्र देवानंद सानप यालाही अटक करण्यात आली. दोघांना वाडीव-हे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सातपूर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भडांगे, हवालदार दिपक खरपडे, अंमलदार राहुल खांडबहाल, अमोल मोरे यांनी तपासात सहभाग घेतला. या थरारक हत्याकांडामुळे नाशिक शहरासह बुलढाणा व अकोला शहरही हादरले आहे. केवळ दुसऱ्या मुलाशी बोलते या कारणातून अथर्वने रागाच्या भरात हे भयानक कृत्य केले. घटनेतील संशयित अथर्व गजानन देशमुख (वय १९) रा. दुसरबीड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा, तसेच सुमित देवानंद सानप (वय १९) रा. भूमराळा, ता. लोणार, जि. बुलढाणा यांना अटक केली आहे.

## संशयाने उद्ध्वस्त केला सुखी संसार...

सुमारास घडलेली घटना ऐकून पुणेकर हादरले आहेत. पतीने चारित्र्यावर संशय घेत आपल्या पत्नीला मारहाण केली, ज्यात पत्नी गंभीर जखमी झाली आणि उपचार सुरु असताना गुरुवारी पहाटे तिचा मृत्यू झाला आहे. घटनेत ठार झालेली २३ वर्षीय सारीका शुभम घोडके ही महिलेची ओळख आहे. आरोपी पती, २९ वर्षीय शुभम श्रीकांत घोडके, हा पानटपरी चालवतो. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, खुनाचा प्रयत्न आणि खुनाचे कलम दोन्ही गुन्हे दाखल केले आहेत. सारिकाची आई, ५० वर्षीय गेणीबाई रुपसिंग चव्हाण यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांनी सांगितले की, शुभम नेहमीच सारिकाच्या चारित्र्यावर संशय करत असे आणि घरात तिला मानसिक आणि शारीरिक त्रास देत होता. २४ मार्च रोजी तो घरी आला आणि तीक्ष्ण हत्याराने तिच्या डोक्यात, हातावर आणि पायावर वार करून गंभीर जखमी केले. शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तातडीने रुग्णालयात नेले, परंतु उपचार दरम्यान तिचा मृत्यू झाला.या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते तपास करत आहेत. त्यांनी घटनास्थळी साक्षीदारांची छाननी सुरु केली असून, आरोपीच्या मानसिक स्थितीबाबत आणि घटना घडण्याच्या परिस्थितीबाबत सखोल तपास सुरु आहेसारिका आणि शुभम यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहेत. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून शेजारी हादरले आहेत. महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित होतं आहे. या घटनेमुळे कौटुंबिक हिंसेवर आणि वैवाहिक संशयावर शहरात चर्चा रंगली आहे. घरातील वाद आणि संशयावर संयम ठेवणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. स्थानिक रहिवाशांनी महिलांच्या सुरक्षेसाठी जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. सामाजिक दृष्टिकोनातूनही हा प्रकार धडा देणारा आहे. घरात हिंसेला कोणतीही जागा नाही, आणि प्रत्येक पती-पत्नीने संयम आणि संवाद राखणे आवश्यक आहे.

## एकतर्फी प्रेमाचा भयंकर शेवट झाला...

विद्यार्थ्यावरबरीच बंधने असतात. ती बंधने महाविद्यालयात आल्यानंतर कमी होतात. त्यामुळे असे विद्यार्थी या मोकळीकीचा मनमुराद आनंद लुटतात. महाविद्यालयात आल्यानंतर अशा कुमारवयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या मनाजोगे कपडे परिधान करण्याची सुट मिळत असते. त्यामुळे बहुतेक विद्यार्थी स्टाईलीश कपडे घालून भिन्नलिंगी विद्यार्थ्यांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात. एखादी विद्यार्थीनी एखाद्या विद्यार्थ्याच्या मनात भरली म्हणजे तो हर प्रकारे तिला आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असतो. कधी कधी असे प्रयत्न यशस्वी होतात तर कधी कधी त्यातून वादाचे प्रसंग देखील उद्भवतात. जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील एका गावात असाच वादाचा प्रसंग घडला. त्यातून त्या विद्यार्थीनीच्या भावाचा चाकू हल्ल्यात जीव गेला. यावल तालुक्यातील एका गावात गौरव नावाचा तरुण रहात होता. कनिष्ठ महाविद्यालयात शिकणारा गौरव हा तारुंण्याच्या सीमेवर उभा होता. तो अठरा वर्षाचा देखील नव्हता. तो ज्या गावात रहात होता त्याच गावातील एक तरुणी देखील तो शिकत असलेल्या महाविद्यालयात शिक्षण घेत होती. दोघांचे गाव आणि महाविद्यालय एकच होते. ती अल्पवयीन तरुणी अल्पवयीन गौरवच्या मनात भरली. त्यामुळे हर प्रकारे तो तिला आपलेसे करण्याचा प्रयत्न करत होता. एके दिवशी त्याने तिच्याकडे मैत्रीचा प्रस्ताव ठेवला. तु माझ्यासोबत मैत्री कर असे तो तिला म्हणाला. मात्र तिने त्याच्या प्रस्तावाला नकार दिला. तिने हा प्रकार तिच्या घरी कथन केला. त्यामुळे तिच्या घरचे सदस्य गौरव याच्यावर चिडले. हा प्रकार प्राथमिक स्वरुपात असल्यामुळे सुरुवातीला मुलीच्या नातेवाईकांनी त्याला समज दिली. मात्र त्यामुळे त्याच्यावर फारसा फरक पडला नाही. गौरवचा तिच्यापुढे मैत्रीचा प्रस्ताव कायम होता. तो तिचा नाद सोडण्यास तयार नव्हता. त्यातून दोन परिवारात वादाची ठिणगी पडली. एकाच गावातील दोन परिवारात वादाची धुसफुस सुरु होती. दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ चा दिवस उजाडला. या दिवशी गौरवच्या आत्याने त्या मुलीच्या नातेवाईकाकडे बघून जोरजोरात शिवीगाळ सुरु केली. 'यानेच माझा भाचा गौरवला गावातून पळवून लावले' असे म्हणत तिने सुरु केलेली शिवीगाळ बघून इतर नातेवाईक जमा झाले. मुलीच्या नातेवाईकांनी गौरवच्या आत्याला समजावण्यास सुरुवात केली की मागचा विषय कशासाठी काढत आहात. बघता बघता दोन्ही परिवारातील नातेवाईक मोठ्या प्रमाणात जमा झाले. गौरवच्या परिवाराकडील काही नातेवाईक हातात काठ्या घेत रस्त्यावर आले. मुलीच्या नातेवाईकांना शिवीगाळ व काठीने मारहाण करु लागले. त्यात मुलीचा भाऊ त्याठिकाणी वाद सोडवण्यासाठी आला. त्यावेळी गौरव आणि त्याच्यासोबत असलेला मुंबई पोलिस दलातील कर्मचारी या दोघांच्या हातात चाकू होता असे काहींचे म्हणणे आहे. मात्र केवळ गौरवच्या हातात चाकू होता असे देखील काहींचे म्हणणे आहे. 'मी पोलीस आहे, माझे कोणीच काही करु शकत नाही, यांना मारा' असे तो म्हणाला. त्याचे ऐकून गौरवने मुलीच्या भावाच्या पोटावर तसेच अंगावर चाकूने वार करण्यास सुरुवात केली. त्यात त्या मुलीचा भाऊ जखमी होत जमीनीवर कोसळला. जणू काही युद्धभुमीचे स्वरुप या घटनास्थळाला प्राप्त झाले होते. बराच वेळ हा प्रकार झाल्यानंतर सर्व हल्लेखोर कारने पळून गेले. मुलीचा भाऊ जबर जखमी तर इतर मोठ्या प्रमाणात जखमी झाले. मुलीच्या भावाच्या पोटात चाकूचे घाव बसल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी तातडीने सावदा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मयत घोषित केले. या घटने प्रकरणी एका अल्पवयीनासह एकुण सात जणांविरुद्ध फैजपूर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपासात या घटनेत केवळ एकच चाकू पोलिसांना मिळाला आहे. या घटनेचा अधिक तपास डीवायएसपी अनिल बडगुजर, सहाय्यक पोलिस निरीक्षक रामेश्वर मोताळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मयोनोद्दीन सय्यद तपास करत आहे.

## स्त्रीलंपट व्याभिचारी अभिनेता वासनेने...

मीरा रोड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सोसायटीमध्ये शिरताना आणि तिथून बाहेर पडताना अत्यंत वेगात असल्याचं दिसलं. त्यावरुन हा गुन्हा एक पूर्वनियोजित कट असल्याचं दर्शवतं. सध्या ट्रान्झिट रिमांडवर असलेल्या आरोपीला या आठवड्याच्या अखेरीस शहरात आणलं जाईल आणि त्यानंतरच घटनेचा नेमका क्रम स्पष्ट होईल, असं अधिकाऱ्यांनी सांगितलंआरोपीने यापूर्वी मयत महिलेकडे लैंगिक सुखाची मागणी केली होती, मात्र तिने वारंवार फेटाळून लावल्याच्या वृत्तालाही पोलिसांनी दुजोरा दिला. ज्या फ्लॅटमध्ये ही हत्या झाली, तिथे पूर्वी केवळ आशिषचा मोठा भाऊच राहत असे; परंतु साधारण दीड वर्षापूर्वी आशिषनेही तिथे राहायला सुरुवात केली. सुमन कांबळे यांच्या पश्चात पती आणि चार मुलं असा परिवार आहे. पती चप्पल दुरुस्तीचं काम करतो, तर मोठा मुलगा एका खाजगी कंपनीत काम करतो. सुमन ८-९ घरांमध्ये घरकाम करुन आपल्या कुटुंबाला हातभार लावत असे. ती गेल्या तीन वर्षापासून आशिष मेश्रामच्या घरी काम करत होतीएफआयआरनुसार, जानेवारी महिन्यात आशिषने सुमनच्या दुसऱ्या मुलाला फोन केला होता. सुमनने आपल्याकडे काम करणं बंद केलं किंवा आपल्या लैंगिक मागणीला नकार दिला, तर तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. याच वेळी, त्या मुलाने आपल्या आईकडे याविषयी विचारणा केली. अखेरीस सुमनने आपल्यावर ओढवलेल्या गंभीर प्रकाराविषयी मोकळेपणाने सांगितलं. आशिष आपल्याकडे लैंगिक सुखाची मागणी करत असल्यामुळेच आपण त्याच्या घरी काम करणं बंद केल्याचं सांगितलं. हे ऐकून तिचा मुलगा संतापाने पेटून उठला. आशिषचा शोध घेत त्याच्या फ्लॅटमध्ये गेला; परंतु त्याला आशिष तिथे आढळला नाही. काही दिवसांनंतर जेव्हा त्या मुलाला आशिष मिरा रोड परिसरात दिसला, तेव्हा त्याने आशिषला बेदम मारहाण केली आणि आपल्या आईपासून दूर राहण्याची त्याला ताकीद दिली.त्यानंतर आशिषच्या मोठ्या भावाने सुमनला आश्वस्त केलं की, आपला भाऊ आता आपल्यासोबत राहत नाही आणि त्यामुळे तिने त्या घरात पुन्हा कामावर रुजू व्हावे. बुधवारी रात्री जेव्हा सुमन कामासाठी त्यांच्या फ्लॅटवर गेली, तेव्हा आशिषने घरात प्रवेश केला आणि तिची हत्या केल्याचा आरोप आहे.

## दिराचा अखेर शेवट करण्याचे ठरले...

रामकृष्ण भटकर यांना त्यांचा पुतण्या स्वप्नील याने फोन करून माहिती दिली की, त्यांचे भाऊ संजय रामकृष्ण भटकर (वय ५०) यांचा मृत्यू झाला आहे. स्वप्नीलने सुरुवातीला बनाव रचत सांगितलं की, संजय हे रात्री जेवण करून गोठ्यात झोपले होते आणि सकाळी ते मृतावस्थेत आढळला. याप्रकरणी माना पोलीस स्टेशनमध्ये मर्ग दाखल करण्यात आला होता. ठाणेदार गणेश नावकार यांनी तातडीने घटनेचं गांभीर्य ओळखून पार्थिव शवविच्छेदनासाठी लक्ष्मीबाई देशमुख रुग्णालय, मूर्तिजापूर येथे पाठवला. शवविच्छेदन अहवालात धक्कादायक बाब समोर आली; संजय भटकर यांचा मृत्यू नैसर्गिक नसून गळा आवळल्यामुळे श्वास गुदमरून झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. वैद्यकीय अहवालानंतर अज्ञात इसमाविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास वेगवान केला. गोपनीय माहिती आणि संशयावरून पोलिसांनी मृतक संजय यांची वहिनी संगीता विनोद भटकर (वय ४८) आणि पुतण्या स्वप्नील विनोद भटकर (वय २५) यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या या दोघांनीही पोलिसी खाक्या दाखवताच घरगुती वादातून मारहाण करून गळा आवळून हत्या केल्याची कबुली दिली. सदर कारवाई अकोला पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे आणि पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## एकरकमी रूपांतरण अधिमूल्याचा भरणा ३१ मार्चपर्यंत करा – रोहिणी नऱ्हे-विरोळे

**लातूर** : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अकृषिक (NA), वाणिज्य आणि औद्योगिक वापरासाठी असलेल्या जमिनीवर यापुढे वार्षिक अकृषक कर आकारला जाणार नाही. त्याऐवजी, अशा सर्व जमिनींसाठी जमीनधारकांना आता 'एकरकमी रूपांतरण अधिमूल्य' भरावयाचे असून लातूर तालुक्यातील नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे. यासाठी संबंधित खातेदारांनी त्यांच्या सात-बारा उताऱ्यावरील नोंद असलेल्या क्षेत्राकरिता, चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार १००० चौ. मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी ०.१० टक्के, १००१ ते ४००० चौ. मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी ०.२५ टक्के आणि ४००१ चौ. मीटरपुढील क्षेत्रासाठी ०.५० टक्के अधिमूल्याचा भरणा करणे आवश्यक आहे. हा कर केवळ एकदाच भरावयाचा असून, त्यानंतर जमीनधारकांना कोणताही महसुली कर भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 3/28/2026 8:25 PM Page 1




# वाडा उपजिल्हा रुग्णालय विस्तार अडचणीत




**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागासाठी जीवनदायी ठरलेल्या वाडा ग्रामीण रुग्णालयाच्या विस्ताराचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर निर्णायक टप्प्यात पोहोचला असून उमरोठे येथील वनविभागाच्या जागेकरीता अंतिम प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने रुग्णालय विस्ताराच्या हालचालींना वेग आला होता. मात्र आता वाडा वनविभागाकडूनच काहीशी अडचण निर्माण झाली आहे. वाडा रुग्णालयाने मंजूर झालेल्या वनविभागाच्या जागेतील रोपवन खर्च भरण्याची पूर्तता केल्यानंतरच जमीन हस्तांतरणाची अंतिम प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची भूमिका वनविभागाने घेतली असल्याने जागा हस्तांतरण प्रक्रिया रखडली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी व आरोग्य विभागाने लक्ष घालून हा तिढा जलद गतीने सोडवावा, अशी मागणी होत आहे. वाडा ग्रामीण रुग्णालय हे वाडा, विक्रमगड व शहापूर या तीन तालुक्यातील नागरिकांसाठी प्रमुख शासकीय आरोग्य केंद्र असून वाड्यासह दुर्गम आदिवासी व ग्रामीण भागातील अनेक रुग्ण दररोज उपचारासाठी येथे दाखल होत असतात. अपघातग्रस्त रुग्ण, गर्भवती महिला, आपत्कालीन सेवा तसेच विविध आजारांवरील उपचारासाठी रुग्णालयावर मोठा ताण निर्माण होत आहे. गेल्या काही वर्षांत वाढती लोकसंख्या, वाढलेली रुग्णसंख्या आणि आधुनिक आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेता विद्यमान जागा व पायाभूत सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे वारंवार समोर आले होते.दरम्यान, ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळाल्यानंतर विस्तारासाठी अतिरिक्त जागेची मागणी प्रशासनाकडे सातत्याने करण्यात येत होती. त्यानुसार उमरोठे परिसरातील वनविभागाच्या ताब्यातील संरक्षित वन स.नं २९८/२५ क्षेत्रातील अडीच एकर भूखंड (जमीन) रुग्णालयासाठी उपलब्ध करून देवून ती हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्यात आला होता. त्यानुसार वनजमीन रुग्णालयाच्या उपलब्धतेसाठी आवश्यक नियमपूर्तता, तांत्रिक पडताळणी व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जव्हार विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. सैपुन शेख यांनी २७ जानेवारी २०२६ रोजी अंतिम मंजुरी दिली आहे. मंजुरीनंतर सदर प्रस्ताव हस्तांतरण कार्यवाहीसाठी वाडा वनविभागाकडे (पश्चिम) वर्ग करण्यात आला. मात्र अनेक दिवसांपासून प्रत्यक्ष जमीन हस्तांतरण प्रक्रियेला अपेक्षित गती मिळत नसल्याने रुग्णालयाला आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास विलंब होत आहे. याबाबत रुग्णालय प्रशासनाने वनविभागाशी सातत्याने पाठपुरावाकरिता पत्रव्यवहार व स्मरणपत्रे सादर केली. तरीही वनविभागाकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याबाबत वाडा रुग्णालय प्रशासनाने नाराजी व्यक्त केली.

## लेखणीचा दीप प्रज्वलित ठेवणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार गिरीधर गायकवाड यांचा भव्य सत्कार



**देवणी : वार्ताहर**

समाजातील सत्य, न्याय आणि सर्वधर्म समभावाची मशाल आपल्या लेखणीतून सतत प्रज्वलित ठेवणारे ज्येष्ठ पत्रकार गिरीधर किशनराव गायकवाड यांचा श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर भव्य सत्कार करण्यात आला. हा सन्मान श्रीराम प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी गुरुलिंगेश्वर मठ येथील मठाधीश सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते गिरीधर गायकवाड यांचा शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवर व गिरीधर गायकवाड हे केवळ पत्रकार नसून सत्याला शब्द देणारी एक सजग लेखणी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या पत्रकारितेतून नेहमीच सर्व धर्म समभाव जोपासत समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यांच्या लेखणीतून उलगडणारे राजकीय विश्लेषण नेमके, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी असल्यामुळे ते एक उत्कृष्ट संपादक म्हणूनही ओळखले जातात. सामाजिक क्षेत्रातही गायकवाड यांचे कार्य तितकेच उल्लेखनीय आहे. विविध सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि लोकहिताचे प्रश्न मांडण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून सत्यनिष्ठ पत्रकारितेचा आणि समाजभान जपणाऱ्या लेखणीचा सन्मान असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या सत्कार सोहळ्यामुळे देवणी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गायकवाड यांच्या कार्याला आणखी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या वेळी अमर पाटील व श्रीराम प्रतिष्ठाण चे पदाधिकारी उपस्थित होते.

## देवणी तालुका डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी अजय भातंब्रे

**देवणी : वार्ताहर**



देवणी शहरात तालुकास्तरीय बैठकीचे नियोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये माजी सरपंच देविदास पतंगे, अनिल कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती, खालील प्रमाणे तालुकास्तरीय कार्यकारणी सर्वाच्या मतानी जाहीर करण्यात आली आहे. देवणी तालुकास्तरीय अध्यक्षपदी अजय भातंब्रे, उपाध्यक्षपदी प्रमोद शिंदे, सचिव जयभीम देवणीकर, सहसचिव सुलतान पतंगे, कोषाध्यक्ष संदीप शिंदे, सह कोषाध्यक्ष अजय तुळजापुरे, संघटक विक्रम कांबळे, सल्लागार डॉ संजय घोरपडे, देविदास पतंगे, अनिल कांबळे, अक्षय शिंदे, मिरवणूक प्रमुख अजय शिंदे, संजय शिंदे, विद्यासागर शिंदे,अमर बोरे, अमित संभाळे, प्रशांत ढवळे, राजकुमार पतंगे, प्रकाश भातंब्रे, प्रसिद्धी प्रमुख गिरधर गायकवाड, नरसिंग सूर्यवंशी, प्रशांत कांबळे, लक्ष्मण रणदिवे, सदस्य भीम बोरे, धम्मरत्न घोरपडे, संदीप सूर्यवंशी, आत्माराम गायकवाड, आशिष पतंगे, विशाल घोरपडे, सचिन भातंब्रे, विक्रम सपताळे, किरण गायकवाड, निलेश घोरपडे, मल्हारी पतंगे, सुरज पतंगे, धम्म सुर्यवंशी, दिपक कांबळे, बस्वराज घोरपडे आदिची निवड करण्यात आली आहे.

## होनाळी येथे पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पाचा शुभारंभ



**देवणी : वार्ताहर**

ग्रामीण भागातील शेतजमिनींची पोटहिस्सा मोजणी करून नकाशे, सातबारा व अधिकार अभिलेख अद्ययावत करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील होनाळी येथे एक महत्त्वाचा पथदर्शी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या नियोजन व जनजागृतीसाठी ग्रामपंचायत होनाळी येथे तालुकास्तरीय समितीची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा निलंगा येथील उपविभागीय अधिकारी श्री. झाडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर रामदास पांचाळ (होनाळीकर) तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर, श्रीमती पटील मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सदस्य म्हणून देवणी तहसीलदार वाडकर तसेच संबंधित भूमि अभिलेख कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत मार्गदर्शन करताना श्रीमती पाटील यांनी सांगितले की, पोटहिस्सा मोजणीमुळे शेतजमिनींचे अचूक विभाजन होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हिस्सा स्पष्टपणे समजेल. तर अध्यक्षीय भाषणात श्री. झाडके यांनी प्रकल्पाच्या प्रशासकीय प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गावकरी व शेतकरी बांधवांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या सभेमुळे होनाळी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून महसूल विभागाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## प्रा. तानाजी भोसले यांचा सत्कार





**लातूर : वार्ताहर**

स्विफ्टन लिफ्ट एज्युकेशन मीडिया पुणेचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यशास्त्र कनिष्ठ महाविद्यालय परिषदेचे लातूर विभागीय सचिव प्रा. तानाजी भोसले यांचा लातूर येथे सत्कार करण्यात आला. प्रा. तानाजी भोसले हे संत कबीर प्रतिष्ठानचे नियमक मंडळ सदस्यही आहेत. प्रा. तानाजी भोसले यांनी गावभागातील मागास विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. राष्ट्र भाषा हिंदीचा प्रसार प्रचार आदि कार्यात सहभाग नोंदवला याबद्दल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वसंत बचत गटाचे उपाध्यक्ष पांडुरंग देडे, मार्गदर्शक प्राचार्य आर. डी.निटू रकर, सल्लागार व्यकट बिराजदार आदींनी त्यांचा सत्कार केला व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नालासोपाऱ्यात रेबीजमुळे ९ वर्षीय मुलीचा दुर्दैवी अंत



**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा येथे रेबीजची लागण झाल्यामुळे नऊ वर्षीय मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. कशिश सहानी असे या चिमुकलीचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. कशिश ही नालासोपारा पश्चिमेकडील सुबोध सागर इमारतीत आपल्या पालकांसोबत राहत होती आणि इयत्ता चौथीमध्ये शिकत होती. सुमारे सहा महिन्यांपूर्वी आपल्या आजोबांसोबत जात असताना एका श्वानाच्या नखाचा तिला ओरखडा लागला होता. त्यावेळी तिला उपचारासाठी दवाखान्यात नेले होते, मात्र इंजेक्शनच्या भीतीने ती खूप रडली. त्यानंतर जखम लवकर भरून आल्याने कुटुंबीयांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, तीन-चार दिवसांपूर्वी तिची प्रकृती अचानक बिघडली. तिने अन्न-पाणी सोडले आणि डोळे लाल झाले होते. घरच्यांनी तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेले, तिथे डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर तिला उपचारासाठी मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात हलवण्यात आले. दुर्दैवाने उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. रेबीजच्या संसर्गामुळे तिचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाले आहे या घटनेनंतर सुबोध सोसायटीच्या रहिवाशांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. परिसरात भटक्या श्वानांचा मोठा वावर असून, त्यांच्या बंदोबस्ताची मागणी नागरिकांनी लावून धरली आहे. विरोधी पक्षनेते मनोज पाटील यांनीही घटनास्थळी भेट दिली असून, येत्या महासभेत हा मुद्दा तीव्रतेने उपस्थित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी घटनास्थळी पाहणी केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार मुलगी ज्यांच्या संपर्कात आली होती, त्या सर्वांची (आई-वडील व इतर मुले )आरोग्य तपासणी केली जाणार आहे. तसेच लहान मुलांना इंजेक्शनची भीती वाटते, त्यामुळे अनेकदा ते जखमेची गोष्ट लपवतात. अशा वेळी पालकांनी मुलांशी प्रेमाने संवाद साधून त्यांना विश्वासात घ्यावे, कुत्रा किंवा मांजर चावल्यास किंवा ओरखडा लागल्यास घरगुती उपायांवर अवलंबून न राहता, तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात जाऊन उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे डॉ भक्ती चौधरी यांनी सांगितले आहे.

## मोहफुलांपासून पौष्टिक पदार्थ निर्मितीमुळे महिला सबलीकरणासोबत उपजीविकेच्या संधी

### रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या कार्यशाळेस सुरुवात




**वैजापूर : वार्ताहर**

रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या मोहफुलांपासून पौष्टिक पदार्थ बनविण्याच्या कार्यशाळेमुळे महिला सबलीकरणासोबतच उपजीविकेच्या अनेक संधी उपलब्ध होतील अशी अपेक्षा आदिवासी विकास विभाग यावलचे सहायक प्रकल्पाधिकारी सतिश पाटील यांनी व्यक्त केली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर सरपंच दत्तर सिंग पावरा, वनरक्षक विजय शिरसाठ, प्रशिक्षक डॉ. सतिश गोगुलवार, शालिनीताई, अध्यक्ष गिरीश कुळकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव पंकज व्यवहारे, विद्याताई आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस मान्यवराचे हस्ते सुती अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रशांत सुर्यवंशी यांनी जीवन में कुछ करना है तो हिम्मत हारे मत बैठो... हे गीत सादर केले.

सरपंच दत्तर सिंग पावरा म्हणाले मोहफुलांचा उपयोग केवळ दारु बनविण्यासाठी माहिती होता मात्र रोटरी व गांधीतीर्थमुळे या नवीन पदार्थाची माहिती झाल्याचे सांगितले. वनरक्षक विजय शिरसाठ यांनी वनसंपदा आपल्यासाठी असून तिचा सुयोग्य कारणासाठी वाहावा. वनसंपदेच्या संवर्धन व मुल्यसंवर्धन याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता सांगितली. डॉ. गोगुलवार यांनी आपण कार्यशाळेतून मिळालेले शिक्षण व्यवहारात उपयोगी आणावे असे आवाहन केले. आयोजकांनी महिलांनी निर्माण केलेल्या पदार्थांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे असेही आवाहन केले. आज कार्यशाळेत मोहफुलांचा चिवडा, मोहफुलांचे लाडू व केक बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यशाळेस ३८ आदिवासी भगिनींनी सहभाग घेतला आहे. दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत सुर्यवंशी यांनी तर आभार सचिव सुभाष अमळनेरकर यांनी मानले. कार्यक्रमास चंद्रकांत चौधरी, अर्जुन प्रसाद, रौनक, सतिश चौरसिया, पायल, अश्विनी, राखी, अभिषेक, वैभव, रजत, जयश्री, आशिक, आयुष, राहुल, युवराज कोळी, बाळू बारेला आदी उपस्थित होते.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या 'वारली' कलेला नवी ओळख; जिल्हा परिषदेत प्रेरणादायी प्रदर्शन



**पालघर : वार्ताहर**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत त्यांना स्वावलंबनाकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद पालघरमार्फत ३९ दिवसांचे वारली पेंटिंगचे विशेष प्रशिक्षण सात दिव्यांग शाळांना देण्यात आले होते. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या कौशल्यांच्या आधारे आज जिल्हा परिषद येथे वारली कलेच्या विविध वस्तूंचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. उद्घाटनानंतर त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करत विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक केले. साध्या माध्यमांतून साकारलेल्या या कलाकृतींमध्ये ग्रामीण जीवन, निसर्ग आणि संस्कृतीचे सुंदर दर्शन घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद शरीक मसलत (सा.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील (पंचायत), कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी तसेच रवींद्र शिंदे यांच्या पत्नी अनिता शिंदे उपस्थित होत्या. जिल्हा परिषदेमार्फत निलेश मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय, जव्हार; शापरिया कर्णबधिर विद्यालय, पालघर; स्वामी परिज्ञानाश्रम कर्णबधिर विद्यालय, विरार; स्वामी परिज्ञानाश्रम मतिमंद कार्यशाळा, विरार; स्वामी परिज्ञानाश्रम मतिमंद शाळा, विरार; जीवदानी मतिमंद शाळा, वसई तसेच मूकबधिर बालविकास केंद्र, डहाणू या सात शाळांमध्ये वारली पेंटिंगचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारली कलेची बारकावे आत्मसात करत विविध कलाकृती साकारल्या. जिल्हा समाज कल्याण अधिकारी तसेच दिव्यांग कल्याण अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांच्या नियोजनातून हा संपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या वस्तूंना उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे व इतर अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंची खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमादरम्यान प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच 'दिशा' अभियान अंतर्गत मतिमंद शाळांमध्ये राबविण्यात येणारा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शाळांनाही प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी लतिका भाकरे (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, समाज कल्याण), मेघा जाधव (सहाय्यक सल्लागार, प्रभारी दिव्यांग कल्याण), सुरेश चव्हाण (वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते, दिव्यांग कल्याण) तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हा उपक्रम दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा ठरला असून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ घडवून आणत स्वावलंबनाच्या दिशेने मार्गदर्शक ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.


### ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर

Email Id:-eebnpalghargmail.com.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद पालघर अंतर्गत **ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग विक्रमगड मधील हातपंप देखभाल दुरूस्ती करिता हातपंप दुरूस्ती फिरते पथक (TATA 407) खरेदी करणे ता. विक्रमगड जि. पालघर.** सदर कामाची निविदा योग्यत्या Item Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करणेसाठी कामाची निविदा प्रथम मागणी करणेसाठी ONLINE द्वारे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक २८/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक ०४/०४/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती ही https://mahatenders.gov.in संकेतस्थळावरूनच प्रसिध्द केली जाईल.

निविदा अटी शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
**(एस. एस. सुरुम)**
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,
जिल्हा परिषद पालघर

30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/28/2026 8:27 PM Page 1



# काळी जादू आणि अंधभक्त राजकारणी!

भारतीय संस्कृतीत देव धर्म आणि रुढी परंपरा यांना मोठे स्थान आहे. त्यामुळे देवाची भीती दाखवून लोकांना घाबरणे सहज शक्य असते. त्यातच संस्कृती आणि परंपरा याचे नाते थेट देवा धर्माशी जोडलेले असल्याने लोकही देवभोळे झालेले आहेत असे केले तर देवाचा कोप होईल तसे केले तर पाप लागेल. या सगळ्या गोष्टी समाजाच्या मनावर अशा काही बिंबवण्यात आल्या आहेत की माणूस त्यालाच आपले कर्तव्य मानतो. त्यातूनच श्रद्धेची जागा अंध श्रद्धेने घेतली आणि माणूस आपला विवेक हरवून बसला. आपल्याला काही तरी मिळवायचे असेल तर केवळ देवावर भरोसा ठेवून चालणार नाही तर काहीतरी वेगळे करायला हवे अशी भावना निर्माण झाली आणि त्यातूनच काळया कधीची संकल्पना उदयास आली असावी. अर्थात तिथेही देव आलाच पण तो वेगळ्या प्रकारचा! या देवाला प्रसन्न करण्यासाठी अघोरी विद्या करावी लागते. त्यासाठी वेगळ्या प्रकारचे साधक असतात आणि ते अघोरी विद्या जाणतात. त्यातून धनप्राप्ती, पुत्रप्राप्ती आदीचा लाभ होतो. अर्थात ही फार पूर्वीच्या काळापासून सुरू आहे. गावागावात भगत तांत्रिक लोकांनी काळया जादूला आर्थिक उत्पन्नाचे साधन बनवून शिकल्या सावरलेल्या लोकांनाही आपल्या नदी लावले. कारण काळया जादूने असाध्य गोष्टही साध्य करता येते लोकांच्या मनावर ठरवण्यात आले. त्यामुळेच काळया जादूचा प्रचार आणि प्रसार होऊ लागला. सध्या जग आधुनिकतेच्या शिखरावर आहे. विज्ञान, तंत्रज्ञान युगात नवनवीन शोध लागले आहेत. त्यामुळे मानवाचं जीवन अधिक सुखकर झाले आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. लोक देशविदेशात जाऊन विविध विषयांचा अभ्यास करताना दिसत आहेत. असे असले तरी आजही अनेक लोक अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकले आहेत. अनेक लोक सध्याच्या या आधुनिक जगातही काळी जादू सारख्या अंधश्रद्धेवर विश्वास ठेवत आहेत. गंभीर बाब म्हणजे उच्च शिक्षित लोकही अंधश्रद्धेमध्ये अडकल्याचे पाहायला मिळत आहे. एका संशोधनानुसार, जुन्या काळात लोक काळ्या जादूवर विश्वास ठेवायचे त्याहूनही अधिक लोक सध्याच्या या विज्ञान युगात यावर विश्वास ठेवतात. संशोधनानुसार, काळी जादू म्हणजे एक अशी कला किंवा विद्या ज्याद्वारे एखादा व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला नुकसान पोहोचवू शकते, असे मानले जाते. फक्त भारतातच नाहीतर जगभरात काळी जादू प्रचलित आहे. भारतासह संपूर्ण जगात असे अनेक तांत्रिक आहेत जे या विद्याचा वापर करतात आणि त्याचा अभ्यास करतात. मात्र, काळी जादू उघडपणे करत नाहीत, तर सर्वांच्या नजरेतून छुप्या पद्धतीने केली जाते. भूतबाधा, वशिकरण आणि अशा अनेक गोष्टी या काळ्या जादूमध्ये येतात. वॉशिंग्टन विद्यापिठातील अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ बोरिस ग्रेशमन यांना एका संशोधनात असे आढळून आले आहे की, आज जगात काळ्या जादूवर खूप विश्वास ठेवला जातो. जुन्या काळातील लोक काळ्या जादूवर विश्वास ठेवत होते, त्यापेक्षा अधिक लोक सध्या यावर विश्वास ठेवतात. या संशोधनादरम्यान, बोरिस ग्रेशमन यांनी ९५ देश आणि प्रदेशांमधून मोठ्या प्रमाणात माहिती गोळा केली. या संशोधनामध्ये १.४ लाख लोकांचा समावेश होता. या सर्वपैकी ४० टक्के लोकांचा काळ्या जादूवर विश्वास आहे. या लोकांनी सांगितले की, ते काळ्या जादूवर विश्वास ठेवतात आणि काळी जादू खरे असल्याचे मानतात. त्यांचा विश्वास आहे की काळ्या जादूचा त्यांच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो. काळ्या जादूच्या बाबतील प्रत्येक देशाचे आणि तेथे राहणाऱ्या लोकांचे मत वेगळे असल्याचे या संशोधनात आढळून आले. भारतातही गेल्या काही काळात अंधश्रद्धा आणि त्यासंबधित गुन्हे समोर आले आहेत. काही देशांमध्ये खूप कमी लोकांचा यावर विश्वास होता, तर काही देशामध्ये खूप जास्त लोकाचा विश्वास होता. काही देशांमध्ये १० टक्क्याहून कमी लोक काळी जादूला मानतात. पण, असेह काही देश आहेत जिथे संशोधनात सहभागी झालेल्या ९० टक्के लोकांनी सांगितले की, त्यांचा या काळ्या जादूवर आणि त्याच्या परिणामांवर विश्वास आहे. शाहू फुले आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात आजही काळया जादूचा किती आणि कसा प्रभाव आहे ते खरात प्रकरणावरून दिसून आले. त्याचबरोबर या काळ्या जादूमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला. मालवण तालुक्यातील नांदोस गावात पैशाचा पाऊस पडण्याची बतावणी करून ११ लोकांचा जीव घेण्यात आला. तर भंडारा जिल्ह्यातील मानवत मध्ये पुत्रप्राप्ती आणि जमिनीतील धन प्राप्तीसाठी ११ निरपराध बालिकांची हत्या करण्यात आली. तेंव्हा हे कुठेतरी थांबायला हवे. सध्या काही राजकारणीच भोंदूबाबांच्या नादी लागलेले आहेत. त्यामुळे जादुटोणा विरोधी कायदा अस्तित्वात असूनही भोंदूबाबांवर कठोर कारवाई होत नाही. सध्या जो अशोक खरात महिलांचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणी अटकेत आहे. त्याच्या संपर्कात ४० आमदार होते, अशी माहिती उघडकीस आलेली आहे आणि याच ४० आमदारांकडून आता खराटा वाचवण्याची धडपड सुरू आहे. त्यामुळे संविधानाची शपथ घेऊन भोंदूबाबांचे पाय धुणारे तसेच काळया जादूच्या आहारी गेलेल्या या राजकारणी लोकांवर कठोर कारवाई व्हायला हवी.

# महिला उद्योजिका भारताच्या विकासाचा कणा -जयकुमार रावल

## गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस, मॅग्नेट योजना व महिला मॉलच्या माध्यमातून महिलांना बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश




**मुंबई : वार्ताहर**

महिलांचे आर्थिक सबलीकरण हाच भारताच्या विकासाचा कणा असून महिलांनी मोठ्या संख्येने उद्योग-व्यवसायात उतरावे असे आवाहन वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने उद्योजिका कार्यशाळा व प्रदर्शनात पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज आणि गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, उत्पादन, सेवा, शेतीआधारित उद्योग आणि निर्यात अशा सर्व क्षेत्रांत महिला उद्योजिका रोजगारनिर्मिती, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत आहेत. या प्रयत्नांना बाजारपेठ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे. गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस या डिजिटल पोर्टलमुळे लहान उद्योग, स्टार्टअप्स आणि विशेषत: महिला चालवित असलेल्या उद्यमांना देशभरातील सरकारी खरेदी प्रक्रियेत थेट सहभागी होता येते. छोट्या शहरातील महिला उद्योजिकेलाही आता देशातील कोणत्याही शासकीय विभागात आपला माल व सेवा पुरविण्याची संधी मिळत असल्याने गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस हा विकास आणि राष्ट्रीय मान्यतेकडे जाणारा प्रभावी मार्ग ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन अंतर्गत महिला मॉल**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार महिलांच्या उद्योजकतेला बळकटी देण्यासाठी बाजार जोडणी, डिजिटल प्रवेश, आर्थिक समावेशन आणि कौशल्य विकास यावर भर देत असल्याचे पणन मंत्री रावल यांनी सांगितले. पणन विभागामार्फत आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने सुमारे २ हजार कोटी रुपयांचा मॅग्नेट हा कापणी पश्चात विकास प्रकल्प राबविण्यात येत असून, द्राक्षांपासून मनुका, प्राथमिक प्रक्रिया, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि विक्री यासारख्या उपक्रमांसाठी ६० टक्क्यांपर्यंत प्रोत्साहन दिले जात आहे. ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता गटांना सातत्याने बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन अंतर्गत महिला मॉल उभारले जात आहेत. जिल्हा स्तरावर उभारल्या जाणाऱ्या या मॉलमध्ये केवळ महिला उद्योजकांच्या उत्पादनांनाच स्थान मिळेल, मध्यस्थांचे जाळे कमी होऊन थेट संधी उपलब्ध होईल आणि त्यामुळे ग्रामीण महिलांच्या उत्पन्नात वाढ होईल, असा विश्वास पणनमंत्री रावल यांनी व्यक्त केला. महिला आरक्षण विधेयक हे केंद्र सरकारचे एक ऐतिहासिक पाऊल असून, आगामी काळात संसद व विधानमंडळांत एक तृतीयांश महिला प्रतिनिधींना महत्त्वाची स्थानं मिळाल्याने निर्णय प्रक्रियेत महिलांचा प्रभाव वाढेल. महिलेचे यश हे कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे साधन ठरते; ते महाराष्ट्राचे बळ आणि भारताच्या विकासकथेचा भाग आहे. त्यामुळे महिला उद्योजिकांनी आत्मविश्वासाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री म्हणाले, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात उद्योग क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे. यावेळी गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेसचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्य नारायण मीना, भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयांतर्गत नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टच्या संचालक निधी चौधरी, महाराष्ट्र जलसंपदा विनियामक प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्वेताली ठाकरे, पीपल्स रिपब्लिक ऑफ चीनच्या वाणिज्य दूतावासाच्या उपवाणिज्यदूत वँग अवेई, श्रीमती नीलिमा तपस्वी, टिस्सर आर्टिजन ट्रस्टच्या संस्थापक डॉ. मेघा फणसळकर, प्रशासकीय अधिकारी निधी चौधरी, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईच्या व्यापार आणि गुंतवणूक प्रोत्साहन विभागाच्या संचालिका प्रिया पानसरे, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजच्या वरिष्ठ संचालिका संगीता जैन आणि अहिल्याराणी महिला विकास व शैक्षणिक संस्थेच्या प्रतिनिधी यावेळी उपस्थित होत्या.

**ब्रेकींग बॅरिअर्स :** विमेन लीडिंग द फ्युचर ऑफ बिझनेस' या विषयावर गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेसचे सत्यनारायण मीना यांचे प्रमुख भाषण झाले. त्यानंतर महिला उद्योजिका : स्थानिक उद्योगातून जागतिक बाजारपेठेकडे' या सत्रात प्रिया पानसरे, संगीता जैन, डॉ. मेघा फणसळकर, निधी चौधरी, श्वेताली ठाकरे आणि डॉ. मेघा फणसळकर आदींनी आपले विचार मांडले.

दुपारपूर्व सत्रात गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस संदर्भात महिला उद्योजिकांसाठी शासकीय बाजारपेठ खुली करणे या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या सत्रात ई-मार्केटप्लेसची ओळख, महिला उद्योजक आणि सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांसाठी उपलब्ध विशेष तरतुदी आदी विषयांवर महिला उद्योजिकांना माहिती देण्यात आली. त्यानंतर यशस्वी महिलांच्या उद्योगकथा मंचावर उलगडण्यात आल्या. यावेळी विविध महिला उद्योजिकांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ई-मार्केट प्लेसशी संलग्न असलेल्या शर्मिला ओसवाल (वुमनिया बॅसिलिया ऑर्गॅनिक्स प्रा. लि.), परिख भाविनी निशिथ (बुनको जुनको) आणि सौम्या कल्लुरी (सौरवी एन्टरप्रायझेस) या उद्योजिकांचा विशेष गौरव यावेळी करण्यात आला. अहिल्याराणी महिला विकास आणि शैक्षणिक संस्थेशी जोडलेल्या तेजश्री जगदीश घरत कदम, कल्पना गवारे, वैशाली वर्णे, दीपाली कुलथे, पोर्णिमा क्षीरसागर आणि सुरेखा नंदकिशोर भुसे पाटील या विविध क्षेत्रांत कार्यरत नामांकित महिलांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. निर्यात आणि उद्योजकीय प्रवास या सत्रात ई-मार्केटप्लेसवर नोंदणीकृत महिलांनी त्यांच्या यशोगाथा मांडल्या. स्थानिक सरकारी खरेदीतून हळूहळू निर्यात बाजारपेठेत प्रवेश करण्याची प्रक्रिया, त्यातील अडचणी-संधी याबाबत मान्यवरांनी मार्गदर्शन केले. बिझनेस प्रोमोशन आणि ब्रँडिंग फॉर मार्केट एक्स्पॅन्शन या कौशल्य-विकास कार्यशाळेत अध्यक्षा निलीमा तपस्वी आणि उद्योजक तथा शास्त्रज्ञ दिनेश क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. डिजिटल आणि सोशल मीडियाचा वापर करून ब्रँडची दृश्यमानता वाढवणे, देशांतर्गत आणि निर्यात बाजारांसाठी भिन्न ब्रँडिंग धोरणे, महिला उद्योजक चालवत असलेल्या उद्योगांची बाजारातील योग्य पोझिशनिंग, तसेच संस्थात्मक आणि जागतिक खरेदीदारांसमोर विश्वासार्ह प्रतिमा निर्माण करण्याचे तंत्र हे प्रामुख्याने या सत्रामध्ये चर्चेला आले. समारोप सत्रात ई-मार्केट प्लेसच्या प्रतिनिधींनी भागीदार संस्थांना मार्गदर्शन केले.

दरम्यान, ई-मार्केट प्लेसच्या वतीने प्रत्यक्ष विक्रेता नोंदणी, प्रोफाइल तयार करण्यासंबंधी मार्गदर्शन, तक्रार-निवारण, वैयक्तिक सल्लामसलत आणि जनजागृती साहित्याचे वितरण यावेळी करण्यात आले. या कार्यशाळा-प्रदर्शनामुळे महिला उद्योजकांसाठी ई-मार्केट प्लेस प्लॅटफॉर्मवर प्रवेश सुलभ होणे, शासकीय खरेदी प्रक्रियेबाबत जागृती वाढणे, ब्रँडिंग आणि निर्यातसिद्धतेबाबत क्षमतावृद्धी होणे, तसेच धोरणकर्ते, उद्योगनेते आणि मार्गदर्शक यांच्याशी थेट नेटवर्किंगची संधी उपलब्ध झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# एसटी महामंडळाच्या राजमाता जिजाऊ बस सेवेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण!




**मुंबई : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' या बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली. विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या बस सेवा लोकार्पण सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.

**'राजमाता जिजाऊ' बस सेवा**

'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे.

या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास करत बससेवेची सुरूवात केली.

यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त पालघरमध्ये जनजागृती

## टीबी मुक्त भारत अभियान २.०ला सुरुवात



**पालघर : वार्ताहर**

क्षयरोग निर्मूलनाच्या लढ्याला अधिक गती देत २४ मार्च या जागतिक क्षयरोग दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे प्रभावी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याच वेळी जिल्ह्यात ढइ मुक्त भारत अभियान २.० ची औपचारिक सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मराड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, जिल्हा क्षयरोग अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंके, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ. योगेश सुरळकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. चंद्रकांत लोहारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तन्वीर शेख, तसेच जिल्हा क्षयरोग केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरभी व डॉ. कल्पना उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागताने झाली. सूर्या नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याद्वारे क्षयरोगाविषयीचे गैरसमज दूर करत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. कांचन गृह उद्योग व हर्षी इंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णांना पोषणमूल्यांनी समृद्ध फूड बास्केटचे वितरण करण्यात आले. तसेच उपचार पूर्ण करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या टीबी चॅम्पियन्स यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी क्षयरोग निर्मूलनासाठी लवकर निदान, नियमित उपचार आणि समाजाची सामूहिक जबाबदारी या त्रिसूत्रीवर भर देत, क्षयरोगमुक्त भारत साकारण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्षयरोग केंद्राचे जिल्हा समन्वयक मनोज सर, झझडअ जिल्हा कॉर्डिनेटर विशाल सर व त्यांची टीम, तसेच ग्रामीण रुग्णालय पालघर येथील कर्मचारी व STS/STLS यांनी मोलाचे योगदान दिले.

**जागतिक क्षयरोग दिन : इतिहास व संदेश**

२४ मार्च १८८२ रोजी डॉ. रॉबर्ट कोच यांनी मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलॉसिस या जीवाणूचा शोध लावून वैद्यकीय क्षेत्रात ऐतिहासिक टप्पा गाठला. या दिवसाचे स्मरण ठेवत दरवर्षी जागतिक क्षयरोग दिन साजरा केला जातो, जेणेकरून समाजात जागरूकता निर्माण होऊन या आजाराचे निर्मूलन साध्य होईल.

**क्षयरोग : ओळख आणि धोका**

क्षयरोग हा संसर्गजन्य आजार असून तो प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करतो. मात्र, हाडे, मेंदू, ग्रंथी, मूत्रपिंड, त्वचा आदी अवयवांनाही तो बाधित करू शकतो. वेळेत उपचार न केल्यास हा आजार गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

**लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**

- दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला
- संध्याकाळी ताप व रात्री घाम येणे
- भूक कमी होणे, वजन घटणे
- थुंकीत रक्त किंवा छातीत वेदना
- सतत थकवा किंवा मानेला गाठी
- तपासण्या व उपचार - सर्व काही मोफत
- थुंकी तपासणी
- CB-NAAT / TruNat चाचणी
- छातीचा एक्स-रे
- आवश्यकतेनुसार इतर तपासण्या सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये तपासणी व उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत.

क्षयरोग हरवायचा असेल, तर वेळेत तपासणी आणि पूर्ण उपचार हाच एकमेव मार्ग; क्षयरोगमुक्त भारतासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे असे जिल्हा क्षयरोग केंद्र, पालघर यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 5 (CRIME SANDHYA) NEW:Layout 1 3/28/2026 8:27 PM Page 1



# देवणीच्या तहसीलदारांचे वाळू तस्करी करणाऱ्या बोटीकडे अर्थपूर्ण लक्ष; तर रस्ता खुला करून द्या म्हणून आत्मदहन करणाऱ्या शेतकरी महिलेकडे दुर्लक्ष

## मांजरा काठावरील सिंधीकामठ येथे शेकडो ब्रॉस वाळू साठा जप्त करून घरकुल लाभार्थ्यांना देण्याची मागणी



**देवणी : वार्ताहर**

देवणी तालुक्यातील हेळंब येथील शेतकरी सिद्धेश्वर कणजे यांनी सर्वे नंबर ५७व ५४ मधील रस्ता खुला करून द्यावा म्हणून एक दिड महिन्यापुर्वी देवणी तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनासमोर अंगावर पेट्रोल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. काही कर्मचाऱ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी त्याला धरून त्याच्या अंगावरील पेट्रोलने ओलाचिंब झालेला शर्ट काढून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. त्यामुळे आत्मदहनाचा प्रकार टाळला. सदर प्रकरणाची दखल घेऊन देवणीचे तहसीलदार सोमनाथ माळी यांनी सदर प्रकरणात नायब तहसीलदार कांबळे व वलांडीचे मंडळाधिकारी बालाजी केंद्रे यांना अधिकृत पत्र देऊन सदर प्रकरणाचा अहवाल मागवण्यात आला होता. सदर प्रकरणावर स्थळ पंचनामा करून योग्य ती कारवाई करावी व शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा असे पत्र मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे दिले होते.

मंडळाधिकारी यांनी याप्रकरणी थातूरमातूर चौकशी करून याचा अहवाल देवणी तहसीलदार दिला होता. त्यामुळे आत्मदहन करणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला नाही. मंडळ अधिकारी बालाजी केंद्र यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने बघितले नाही. त्यामुळे मला न्याय मिळावा म्हणून सिद्धेश्वर कणजे यांची पत्नी प्रेमला सिद्धेश्वर कणजे यांनी २४ मार्च रोजी तहसील कार्यालय समोर आत्मदहन करणार असल्याचे निवेदन दिले होते. सदर शेतकऱ्याला तहसीलदार न्याय देण्याऐवजी सदर महिला शेतकरी आत्मदहन करते म्हणून देवणी येथे कामकाज अडथळा निर्माण करून आत्मदहन करण्याची धमकी देत असल्याचे पत्र संबंधित देवणी पोलीस स्टेशन यांना देऊन सदर शेतकऱ्यांना घटनात्मक न्याय मिळऊन देण्याऐवजी कारवाई करण्यासंदर्भात सांगितले आहे. सदर प्रकरण तहसीलदार यांच्याकडे न्यायप्रविष्ठ असताना व सदर न्याय मागत असताना तहसीलदार यांना कामात अडथळा वाटत असेल व आत्महत्येची धमकी वाटत असेल तर तालुका दंडाधिकारी यांचे नेमके काम काय? हा प्रश्न उपस्थित होत आहे. देवणी तालुक्यात मांजरा काठावरील सिंधीकामठ येथे शेकडो बरॉस वाळूसाठा जागोजागी उपलब्ध असून हे वाळू साठा जप्त करून घरकुल लाभार्थ्यांना देण्याची मागणी केली जात आहे. माणकेश्वर लासोना या परिसरात बऱ्याच ठिकाणी बोटी बसवून मोठ्या प्रमाणात वाळू तस्कराने उच्छाद मांडला आहे. अनधिकृत बोटीपासून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात आहे. याकडे मात्र तहसीलदार यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे व मंडळ अधिकारी पैसे घेऊन चूप आहेत, तर माझ्यावर अन्याय झालाय मला माझा रस्ता खुला करून द्या अशी अर्तहाक प्रशासनाला देऊन आत्मदहनाचा प्रयत्न एखादी शेतकरी महिला करीत असेल, तर त्यांच्याकडे मात्र तहसीलदार यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे असे दिसून येते. तालुक्यात रमाई आवास योजना व इतर घरकुलांसाठी माफक दरात लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून द्या असे शासनाचे परिपत्रक (जी आर) असताना सुद्धा व अनेक लाभधारक तहसीलदार यांना आम्हाला प्रशासनाने दिलेल्या शासकीय परिपत्रकाप्रमाणे वाळू डेपो निर्माण करून वाळू उपलब्ध करून द्या अशी मागणी वारंवार करीत असताना आपल्या तालुक्यात वाळू नाही म्हणून उडवा उडवीचे उत्तरे देवणीचे तहसीलदार देत आहेत. मात्र अनाधिकृतपणे वाळू तस्करी करणाऱ्या तस्करांकडून आगाऊ दराने घरकुल लाभार्थ्याला वाळू खरेदी करावी लागत आहे.

त्यामुळे या गरीब घरकुल धारकांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. जिल्हाधिकारी मॅडम यांनी देवणी तालुक्यातील अनाधिकृत बोटी लावून तस्करी करणाऱ्या वाळू तस्करावर कारवाई करणार काय हा प्रश्न आता सर्वसामान्य घरकुल लाभार्थी उपस्थित करीत आहेत. तहसीलदार यांना या बोटी संदर्भात माहिती दिली असता याकडे ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. तहसीलदार यांच्या शासकीय वाहणावर यापूर्वी ट्रॅक्टरने वाळू तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टर ड्रायव्हरला आपला ड्रायव्हर म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे तालुक्यात किती ट्रॅक्टर आहेत कोण कोण वाळूची तस्करी करते याची इत्यंभूत माहिती सदर ड्रायव्हरला माहिती असल्यामुळे तालुक्यातील ट्रॅक्टर हप्ते वसुलीचा गोरख धंदा तर चालू नाही ना अशी चर्चा तालुक्यात मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्र तलवाडा येथे एचपीव्ही लसीकरण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी




**पालघर : वार्ताहर**

प्रा. आ. केंद्र तलवाडा येथे HPV (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण कार्यक्रमाची नियोजनबद्ध व प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. सदर कार्यक्रमांतर्गत उपकेंद्र मेढी कार्यक्षेत्रातील पात्र मुलींची निवड करून त्यांना HPV लस देण्यात आली. कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान लाभार्थ्यांची नोंदणी, वैद्यकीय तपासणी, लसीकरणानंतर निरीक्षण तसेच आवश्यक ते आरोग्यविषयक मार्गदर्शन काटेकोरपणे पार पाडण्यात आले. लसीकरण प्रक्रियेत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले असून लाभार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, एएनएम, आशा सेविका तसेच इतर आरोग्य कर्मचारी यांचे समन्वयित योगदान लाभले. HPV लसीकरणाचे महत्त्व, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून होणारे संरक्षण, लवकर निदान व नियमित तपासणीची आवश्यकता याबाबत लाभार्थी व पालकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन

**पालघर : वार्ताहर**

प्राथमिक आरोग्य केंद्र सायवन येथे दि. २५ मार्च २०२६ रोजी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सदर शिबिरासाठी डॉ. राजेंद्र चव्हाण (स्त्रीरोग तज्ञ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या शिबिरादरम्यान एकूण २५ लाभार्थ्यांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या. शस्त्रक्रियेपूर्वी लाभार्थ्यांची तपासणी, समुपदेशन तसेच आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली. तसेच शस्त्रक्रियेनंतर आवश्यक ती काळजी व मार्गदर्शन देण्यात आले. सदर शिबिराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सायवन येथील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कार्य केले. या उपक्रमामुळे कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती वाढण्यास तसेच आरोग्यदायी कुटुंब व्यवस्थापनास चालना मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# डहाणू महोत्सवात ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनाचे आकर्षण

**डहाणू : वार्ताहर**



२० ते २२ मार्च २०२६ दरम्यान आयोजित डहाणू महोत्सवात खाद्य, संगीत, संस्कृती, उद्योग, साहसी खेळ इत्यादी विविध उपक्रमांनी रंजक आणली. नगराध्यक्ष डहाणू नगरपरिषद आयोजित या भव्य महोत्सवास हजारो पर्यटक, प्रवासी, उद्योजक, दुर्गमित्र, स्थानिक नागरिकांनी भेट दिली. या महोत्सवात ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शन संग्रहालय सर्वांच्या आकर्षणाचे व जिज्ञासेचे केंद्रबिंदू ठरले. इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत वसई यांच्या संग्रहातील विविध शस्त्रे यावेळी मांडण्यात आलेली होती. यात जंबिया, गदा, शशपार, खारीमही, परशु, हैद्राबादी, कुऱ्हाड, खंजीर, बिचवा, किंदजल, पेशकबज, कर्द, कुकरी, सुरा, पदांती भाला, अश्वकुंज, गजकुंज, मानाचा भाला, वल्लभ, सांग, वीट, करबल, ढाल, तोफा, तोफगोळे, बंदूक, तलवार प्रकार, धनुष्यबाण, वाघनखं, गुर्ज, विंचवाच्या मुठीचे प्रकार, मत्स्य खंजीर, बंदूक दारू साधने, जमदाड, मराठा धोप, ब्रिटिश तलवार, कट्यार प्रकार इत्यादी एकूण ३०० हून अधिक ऐतिहासिक शस्त्रात्रे संग्रह मांडण्यात आलेली होती. यावेळी प्रदर्शनास भेट देणाऱ्या मान्यवरांना भारतीय शस्त्र परंपरेवर मार्गदर्शन करण्यात आले. विविध स्थानिक शाळा, अभ्यासक, दुर्गमित्र इत्यादी वर्गाने प्रदर्शनास सातत्याने भेटी दिल्या. दुर्गमित्र ओंकार जी मुंबई, निखिल हडळ, प्रतिक भायदे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. पालघर जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा, इतिहास लेखन, पुरातन वस्तू संग्रह यांचे नियमित संवर्धन करण्याचा ध्यास घेणारे इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. राऊत यांनी महोत्सवात उत्तम सेवा देणाऱ्या चिंचणी दत्त मंदिर प्रतिनिधी व बाल गायक यांना विशेष कट्यार, शिवराई भेट म्हणून अर्पण केल्या. समस्त डहाणूकरांनी या महोत्सवाच्या निमित्ताने विनामूल्य शस्त्र प्रदर्शनातून इतिहासाला उजाळा दिला.

# ठाण्यात कोट्यवधींचे एमडी ड्रग्ज जप्त; तिघांना अटक

**ठाणे : वार्ताहर**

नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चरईमध्ये पोलिसांनी २ किलो ६२ ग्रॅम ड्रग्ज जप्त करून एकूण तिघांना अटक केली आहे. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गिरीष पाटील यांना खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर पाटील, उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड यांच्या पथकाने २३ मार्च गरोजी संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी चरईतील एमटीएनएल कार्यालयासमोर सोहेल दिलीप खान (२६, कोपरी) आणि रोहित विलास सीतापुरे (२१, गायकवाड पाडा नं.२, उल्हानगर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एकूण २ किलो ६२ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले. सोहेल खानकडून १ किलो ५६ ग्रॅम आणि रोहितकडून १ किलो ६ ग्रॅम एमडी पावडर




जप्त करण्यात आली. या ड्रग्जचे धागेदोरे राजेश हडावले (२३, कोपरी) याच्यापर्यंत पोहोचल्याने पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे. त्यांनी हे ड्रग्ज कुठून आणले आणि कुणाला देणार होते, याची माहिती पोलीस घेत आहेत. न्यायालयाने तिन्ही आरोपींची २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. पोलिसांनी ही कामगिरी उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहा.पोलीस आयुक्त रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सहा.पोलीस निरीक्षक निलेश मोरे, सोमनाथ कर्णवर पाटील, उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड, राजेंद्र निकम, मोहन परब, हवालदार अमोल पवार, हुसेन तडवी, अजय सपकाळ, अमित सपकाळ, अभिजीत मोरे, गिरीष पाटील, आबाजी चव्हाण, अनुप राक्षे, शिल्पा कसबे, कोमल लादे यांनी कामगिरी बजावली.

## तांबाळा भागातील रामुचा क्लब बंद करण्याची पंचायत समिती सदस्यांची निवेदनाद्वारे मागणी

**देवणी : वार्ताहर**




कासार शिरसी पोलीस ठाणे अंतर्गत तांबाळा गणातील अवैध धंदे बंद करण्याची मागणी नूतन पंचायत समिती सदस्य श्रीदेवी सर्जे यांनी निवेदनद्वारे केली आहे. तांबाळा गणामध्ये चालू असलेला क्लब हा अवैध मार्गाने चालू असून, क्लब मध्ये चुकीच्या पद्धतीने खेळ खेळले जात असून, ज्यात अंधर बहार, थ्री कार्ड व पत्त्या अशा नियम बाह्य पद्धतीने खेळ खेळले जात असून त्यामुळे तरुण व नागरिक चुकीच्या पद्धतीने पैसे लावून त्यांची फसवणूक केली जात आहे त्यामुळे कुटुंबात वाद व भांडणे निर्माण होत आहेत. तरुण व्यसनाधीन होऊन घरी मारझोड करणे, चोरी करणे, बे रात्री घराबाहेर पडणे, तसेच अवेळी गावात गर्दा धिंगाणा घालत असून, क्लब वेळेमध्ये न चालवता दिवस-रात्र चालू असते अशा तक्रारीचे निवेदन नूतन पंचायत समिती सदस्य श्रीदेवी सर्जे यांनी केले आहे, याकडे आता कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी संबंधित क्लब वर तात्काळ कारवाई करून क्लब चालवणाऱ्या रामू वर गुन्हे दाखल करावे अशी मागणी कासार शिरशी परिसरातील नागरिकांतून केली जात आहे. अन्यथा कायदा सुव्यवस्था बिघडल्यास याचे सर्वस्व जबाबदार पोलीस प्रशासन राहील असे नागरिकतून बोलले जात आहे.

# भिवंडी पोलिसांनी गोदामातील घरफोडी व चोरी गुन्ह्याचा लावला छडा; ३ कोटी ७५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर घरफोडी व चोरीचे गुन्हे होत असतानाच भिवंडी तालुका पोलिसांनी एका घरफोडीत चोरीस गेलेले कॅमेरे व कॅमेरा लेन्स या गुन्ह्याचा तपास करीत असताना पकडलेल्या सहा जणांच्या टोळी कडे कसून चौकशी केली असता या गुन्ह्यातील टोळीने केलेल्या एका चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून तब्बल ३ कोटी ७५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान तालुका पोलिस ठाणे क्षेत्रातील मुंबई नाशिक महामार्गावरील वडपे गावच्या हद्दीत असलेल्या रिचलॅन्ड कॉम्पलेक्स या गोदाम संकुलातील के.डब्ल्यू. ई. इंडिया प्रा.लि.च्या गोदामात घरफोडी करून कॅनान कंपनीचे कॅमेरा व कॅमे-याचे लेन्स असा एकुण ३ कोटी ५० लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी केला होता. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास गांभीर्याने करण्याच्या सूचना देत ठाणे ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ.डी.एस



स्वामी यांनी मार्गदर्शन केले. अप्पर पोलिस अधीक्षक अनमोल मित्तल उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालटे यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बारवे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथक बनविण्यात आले. पोउनिरी नरेश निबाळकर, पोहवा जयवंत मोरे, काशिनाथ सोनवणे, दामोदर पवार, नंदकुमार दळवी या पथकाने कौशल्यपूर्ण व अथक परीश्रम घेवून अल्प कालावधीत तांत्रीक तपास व गुप्त बातमीदारांच्या मदतीने अल्प कालावधीत आरोपांचा छडा लावुन किरण मनोहर टोले (२९), प्रमोद मनोहर टोल, गिरीष अशोक, राहुल भगवान दिवेकर (२८), आशिष मधुकर पाटील (३३), शब्बीर अली मोहंमद युसुफ शेख (३४) या सात जणांच्या टोळीचा तपास लागल्यावर यातील किरण टोले, राहुल दिवेकर, शब्बीर शेख, आशिष पाटील यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसून तपास केला असता घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरी केलेले ११८ कॅनॉन कंपनीचे कॅमेरे, १०६ कॅनॉन कंपनीच्या लेन्स, २ एम.व्ही. आर तसेच गुन्हा करतांना वापरलेली ईरटिका कार, ईको गाडी व स्कुटी मोटर सायकल असा एकुण ३ कोटी २५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या चार आरोपींच्या पोलिस कोठडीत त्यांच्याकडे इतर चोरीच्या गुन्ह्यांचा अधिक तपास करीत असताना भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात एका चोरीच्या गुन्ह्याची उकल केली. ज्यामध्ये याच टोळीतील किरण टोले, राहुल दिवेकर, शब्बीर अली मोहमद युसुफ शेख, अजय हनुमंत चन्ने, योगेश धुमाळ, पवन वारघडे, अफ्फान, शाहिद अन्वर खान यांनी एका गोदामात हार्डडिक्स व इतर साहित्य चोरी केल्याची कबुली दिली. त्यामध्ये किरण टोले, राहुल दिवेकर, शब्बीर शेख या तिघांकडून चोरी केलेला ५२ लाख ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या दोन्ही गुन्ह्यात पोलिसांनी सहा जणांना अटक केली असून फरार आरोपींचा शोध व या गुन्ह्यांचा अधिक तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक हर्षवर्धन बारवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नरेश निबांळकर हे करीत आहेत.

# परीक्षा काळातच शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार वाढला

**जव्हार : वार्ताहर**

यंदा दहावी व बारावीच्या परीक्षा संपत असताना शिक्षकांची धावपळ कमी होण्याऐवजी अधिकच वाढत आहे. उत्तरपत्रिका तपासणी, निकालाची तयारी यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच शासनाकडून राष्ट्रीय जनगणना आणि मतदारयादी सखोल पुनर्रीक्षण कामांची सक्ती करण्यात आल्याने जव्हार तालुक्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या दुहेरी जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एप्रिल महिना हा शैक्षणिक वर्षाचा शेवटचा आणि अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. वार्षिक परीक्षांचे नियोजन, देखरेख, उत्तरपत्रिका तपासणी आणि निकाल जाहीर करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. त्यातच 'पॅट' परीक्षांचे अतिरिक्त ओझेही शिक्षकांवर आहे. शिक्षकांना दुपारनंतर जनगणना किंवा बीएलओ कामासाठी फिरावे लागते. या दुहेरी ताणामुळे मानसिक थकवा वाढत असून उत्तरपत्रिका तपासणीसारख्या एकाग्रतेच्या उत्तरपत्रिका तपासणी सारख्या एकाग्रतेच्या कामात त्रुटी राहण्याची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक संघटनांनी शासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली असून, शैक्षणिक कामकाजावर परिणाम होणार नाही यासाठी जनगणना व बीएलओ कामांसाठी स्वतंत्र मनुष्यबळ बीएलओ कामांसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे. आरटीई कायद्यानुसार शिक्षकांना केवळ जनगणना, निवडणूक आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या मर्यादित कामांसाठीच वापरण्याची तरतूद आहे. विविध सर्वेक्षणे आणि इतर कामांसाठीही शिक्षकांना नियुक्त केले जात असल्याने नियमावलीचा भंग होत असल्याचा आरोप केला जात आहे.

# आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी स्वाती शिंदे या वसईतील शिक्षिकेचे नामांकन

**विरार : वार्ताहर**



शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वसई तालुक्यातील शिक्षिका सौ. स्वाती दिपेंद्र शिंदे यांची आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार ध्येय एज्युकेशन फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने देण्यात येणार असून, शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी हा सन्मान दिला जातो. सौ. स्वाती दिपेंद्र शिंदे या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सायवन, ता. वसई, जि. पालघर येथे कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जाणीव निर्माण करणे, नवकल्पना राबवणे आणि सामाजिक भान जपणारे शिक्षण देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. तसेच राज्य व जिल्हा स्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांनी मोलाचे कार्य केलेले आहे. ध्येय एज्युकेशन फाउंडेशनतर्फे आयोजित ध्येय एज्युकेशन आयकॉनिक समिट -२०२५ या राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा सोहळा ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी, पिंपरी- चिंचवड (पुणे) येथे संपन्न होणार असून लवकरच कार्यक्रमाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. या नामांकनामुळे वसई तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली असून शिक्षकवृंद व नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे.

30 MARCH TO 02 APRIL 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/28/2026 8:28 PM Page 1



# गॅस वितरकांकडूनच घरगुती सिलेंडरमधून व्यावसायिक सिलेंडरमध्ये 'गॅस रिफील'



**पालघर : वार्ताहर**

मुंबई, ठाणे व राज्यातील शहरांमधील सुमारे ४० ते ५० टक्के हॉटेल बंद झाले असून उर्वरित अनेक ठिकाणी मर्यादित स्वरूपात खाद्यपदार्थांची उपलब्धता देण्यात येत आहे. अशा परिस्थितीत पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गालगत तसेच विविध शहरी भागांमध्ये अनेक हॉटेल पूर्ववत सुरू असल्याचे दिसून येत आहे. काही गॅस वितरकांकडून घरगुती सिलेंडर मधून व्यावसायिक सिलेंडर मध्ये रिफील करण्याची युक्ती शोधून काढण्यात आली असून अशा प्रत्येक सिलेंडरच्या रिफीलसाठी तीन हजार रुपयांची आकारणी केली जात आहे. केंद्र सरकारने गॅसच्या सिलेंडरच्या दरामध्ये वाढ केल्यानंतर ९ मार्चपासून पाठवण्यात येणाऱ्या सिलेंडर साठ्यासोबत व्यावसायिक सिलेंडर पाठवण्याचे आठवडाभर बंद केले होते. त्यानंतर काही दिवसांनी प्रत्येक सिलेंडर वाहणाऱ्या ट्रक मध्ये जेमतेम आठ ते १२ व्यावसायिक सिलेंडर पाठवले जात असल्याने त्याचा वापर शासकीय वसतीगृह, रुग्णालय, महत्त्वाच्या सार्वजनिक कामाच्या ठिकाणी असणाऱ्या ठेकेदाराला आवश्यक पडताळणी नंतर दिले जात होते. व्यावसायिक सिलेंडर उपलब्ध नसल्याने हॉटेल मालक संघटनांनी मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन भेडसावत असणाऱ्या समस्यांबद्दल माहिती दिली. बहुतांश हॉटेलमध्ये त्यावेळी एक-दोन दिवसाचा सिलेंडर साठा उपलब्ध असल्याचे सांगून नाईलाजाने हॉटेल व्यवसायिकांना बंद करावे लागतील असे हॉटेल असोसिएशनच्या प्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाकडे नमूद केले होते. बोईसर, पालघर व मनोर परिसरात किमान ८० परमिट रूम व तितक्याच संख्येत परमिट रूम नसणारी हॉटेल असून यापैकी सद्यस्थितीत बहुतांश हॉटेल पूर्ववत सुरू असल्याचे दिसून आले आहे. तारापूर बोईसर येथील पाच हॉटेलला पाईपलाईन गॅस उपलब्ध असून उर्वरित हॉटेलला व्यावसायिक गॅस वितरणात अडचणी निर्माण झाल्याने काहीनी लाकडावर चालणाऱ्या शेगड्या, इलेक्ट्रिक शेगडी यावर काही पदार्थांचे उत्पादन करण्याचे पसंद केले आहे. मात्र त्यामध्ये ग्राहकांना गरम, ताजे जेवण देणे शक्य होत नसल्याचे दिसून आले आहे. शिवाय तंदूर पदार्थांवर सध्या जोर दिला जात आहे. असे असताना देखील राष्ट्रीय महामार्ग लगत असणाऱ्या बहुतांश हॉटेलमध्ये तसेच जिल्ह्यातील शहरी भागातील अनेक हॉटेलमध्ये व्यावसायिक सिलेंडरचा वापर केला जात असल्याचे पुरवठा विभागाकडून केल्या जाणाऱ्या निरीक्षणा दरम्यान दिसून आले आहे. मुळात कंपन्यांकडून व्यवसायिक सिलेंडरचा पुरवठा अत्यल्प प्रमाण केला गेला असताना तसेच हॉटेल व्यवसायाकडे सिलेंडर साठा नसल्याचे प्राथमिक तपासणी दरम्यान आढळून आल्याने व्यवसायिक गॅस सिलेंडर मधून हॉटेल मधील इंधन पुरवठा कसा सुरु राहिला त्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

व्यवसायिक सिलेंडरची उपलब्धता अत्यंत मर्यादित स्वरूपामध्ये उपलब्ध असताना व्यवसायिक सिलेंडरचा वापर करून घरगुती मध्ये इंधन पुरवठा करण्याची युक्ती काही गॅस वितरकांनी शोधून काढली आहे. ग्रामीण भागातील काही घरगुती गॅस सिलेंडर मधून विशिष्ट पद्धतीने जोडणी करून व्यावसायिक (कमर्शियल) सिलेंडर मध्ये गॅस ट्रान्सफर करण्याची पद्धत अवगत करण्यात आली आहे. होस पाईप द्वारे, लहानशा पंपाच्या आधारे घरगुती सिलेंडर मधील एलपीजी गॅस व्यावसायिक सिलेंडर मध्ये भरण्याचे तंत्र (ट्रान्सफर) निर्जन ठिकाणी अंधाराच्या वेळी केले जात असून अशा आधारे प्रत्यक्षात पुरवठा न करता अनेक हॉटेलमधील व्यवसायिक सिलेंडर भरले जात असून या कामी प्रत्येक घरगुती सिलेंडर मधील एलपीजी ट्रान्सफर करिता तीन हजार रुपयांची आकारणी केली जात असल्याची माहिती पुढे आली. घरगुती वापराचा एलपीजी गॅसचा काळाबाजार टाळण्यासाठी जिल्हा पुरवठा विभागाने विशेष पथकाचे आयोजन केले असून तालुका आणि आहे पुरवठा अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्ध केले आहेत. अशा प्रकारचे गैरप्रकार होत असल्यास त्याची माहिती पुरवठा विभागाला द्यावी असे आव्हान जिल्हा पुरवठा अधिकारी सीमा महल्ले यांनी केले आहे. जिल्ह्यात एलपीजी संदर्भात विविध तपासणी दरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा अनुचित प्रकार आढळून आला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तरी देखील व्यावसायिक गॅस रिफील केली जाण्याची शक्यता पाहता या संदर्भात विशेष पाहणी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**कृषी वापरातील युरियाचा गैरवापर**

तारापूर येथील वस्त्र उद्योगांमध्ये डाईंग प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात युरियाची आवश्यकता असते. शासनाचे अनुदान दिले जाणार आहे. युरियाचा वापर केला जात असल्याचे दिसून आले आहे. निर्जन ठिकाणी अनुदानित युरियाची वाहतूक करणारे ट्रक थांबून त्यामधील युरिया गोणी उलटून व्यावसायिक वापरासाठी औद्योगिक क्षेत्रात देण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. असे करून शासकीय यंत्र व तपासणी यंत्रणा यांना बेसावध ठेवून राजरोसपणे शासनाचे नुकसान होत असून अशाच पद्धतीचा अवलंब घरगुती गॅस सिलेंडर मधून व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या बेकायदेशीर ट्रान्सफर केला जात असल्याचे दिसून आले आहे.

# वसईतील ग्रामीण महिलांची पुन्हा चुलीकडे



**वसई : वार्ताहर**

केंद्र सरकारच्या उज्वला योजनेमुळे धूरमुक्त स्वयंपाकघराचे स्वप्न पाहणाऱ्या ग्रामीण महिलांना आता महागाईमुळे पुन्हा चुलीचा आधार घ्यावा लागत आहे. गॅस सिलिंडरचे वाढलेले दर आणि वेळेवर उपलब्धता नसल्याने महिलांचे दैनंदिन जीवन पुन्हा जुन्याच अडचणीत अडकले आहे. देशातील गरीब महिलांना धुरापासून मुक्तता मिळावी आणि त्यांचे आरोग्य सुधारावे या उद्देशाने केंद्र सरकारने उज्वला योजनेअंतर्गत गरीब कुटुंबांना स्वयंपाकासाठी गॅस जोडणी दिली. या योजनेमुळे अनेक महिलांच्या स्वयंपाकघरात चुलीऐवजी गॅसचा वापर सुरू झाला आणि त्यांचे जीवन काही प्रमाणात सुधारले. वसई तालुक्यात सुमारे ५६४० लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळाला. सुरुवातीला महिलांमध्ये आनंदाचे वातावरण होते. धुरापासून मुक्तता मिळाल्याने आरोग्य सुधारण्यास मदत झाली आणि स्वयंपाकाची प्रक्रिया सुलभ झाली. मात्र, हे सुख फार काळ टिकले नाही. सध्या गॅस सिलिंडरचे दर सुमारे ९०० रुपयांच्या घरात पोहोचले आहेत. इतकी मोठी रक्कम महिन्याच्या खर्चातून काढणे अनेक कुटुंबांना शक्य होत नाही. त्यातच गॅस बुकिंग करूनही वेळेवर सिलिंडर मिळत नसल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागातील अनेक महिलांनी पुन्हा पारंपारिक चुलीचा वापर सुरू केला आहे. सरपण गोळा करण्यासाठी महिलांना अतिरिक्त मेहनत घ्यावी लागत आहे. त्यामुळे त्यांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाढत आहेत, तसेच आरोग्याच्या समस्या पुन्हा डोके वर काढण्याची भीती निर्माण झाली आहे. महागाईमुळे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसवणे कठीण झाले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवताना गॅससारख्या सुविधांवर खर्च करणे शक्य होत नाही. परिणामी, उज्वला योजनेचे उद्दिष्ट पूर्णत्वास जाताना अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे.

# पाण्याच्या बादलीत बुडून एक वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

मिरा-भाईंदर : घरात खेळत असताना तोल जाऊन भरलेल्या पाण्याच्या बादलीत बुडाल्याने एक वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घडलेल्या घटनेमुळे आजूबाजूच्या परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.ईशिका वर्मा (वय १ वर्ष ११ महिने) असे मृत्यू झालेल्या चिमुकलीचे नाव आहे. ती वसई पूर्व येथील खैरवाडा परिसरात कुटुंबियांसोबत राहत होती. दरम्यान, सोमवारी घरात खेळत असताना तिचा तोल गेला. यावेळी जवळच असलेल्या भरलेल्या बादलीत ती पडली. नाका-तोंडात पाणी गेल्यामुळे ती बेशुद्ध झाली. यामुळे घरच्यांनी मुलीला तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीदरम्यान मुलीचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेची माहिती मुलीचे वडील पारस वर्मा यांनी वालीव पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा करून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भोये यांनी दिली आहे.

पान १ वरून....

## संशयी पतीचे डोकेच फिरले...

दिवसामागून दिवस जात होते. परंतु गावातील मजुरीवर घराचा गाडा चालेना म्हणून बसवराज हा बंगळुरू येथे कामाला गेला. वर्ष दोन वर्ष तो बंगळुरू मध्ये मजुरीचे काम करू लागला. महिना पंधरा दिवसातून तो गावाकडे येत जात होता. दरम्यान तो बंगळुरू येथे कामाला गेला असता त्याला दारू पिण्याचे व्यसन लागले. गावाकडे तो आला की, कायम दारूच्या नशेतच राहत होता. त्याला आपल्या एका जवळच्या मित्राकडून समजले की, तो बंगळूरू येथे कामाला गेला असताना गावातील एका तरूणासोबत त्याच्या पत्नीचे विवाहबाहय प्रेमसंबंध निर्माण झाले आहेत. त्याची पत्नी आणि तो तरूण एकाच ठिकाणी मजुरीचे काम करीत आहेत. हे ऐकुन बसवराज याचे डोक हलले त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. या कारणातून तो शिवाक्का बरोबर रोज भांडण करू लागला. तिला तिच्या प्रेमसंबंधाचा जाब विचारून मारहाण करू लागला. हल्ली तो बंगळुरूला कमी आणि गावातच जास्त राहत होता. पत्नीवर संशय असल्याने तो तिच्यावर लक्ष ठेवून होता. तो कायम तिच्या मागे मागे फिरत होता. भांडणात ती त्याला सांगत होती की, आपण दोघांनी घरच्यांच्या विरोधात जावुन प्रेम विवाह केला आहे मग मी तुम्हाला सोडून दुसऱ्या बरोबर कशाला प्रेम संबंध करीन तरी पण तिच्या सांगण्यावर त्याचा विश्वास नव्हता. त्याच्या डोक्यात फक्त एकच बसले होते की आपली पत्नी आपला विश्वास घात करीत आहे. ती मजुरी साठी म्हणून बाहेर जाते आणि बाहेर ती तिच्या यारा सोबत गुलछर्रे उडवित असते. हल्ली तो दारूच्या नशेत घरात येवून रोज तिला कन्नडमध्ये शिवीगाळ करीत मारहाण करीत होता. तुझा यार कोण आहे? सांग मला मी त्याला ही सोडत नाही आणि तुला ही सोडत नाही असे म्हणत होता. आपल्या तीन्ही लहान मुलांच्याकडे बघून ती गप्प राहत होती. परंतु त्याचा तिच्यावरील संशय काही कमी होत नव्हता. मजुरीसाठी जाते असे सांगून शिवाक्काही बाहेर तिच्या याराबरोबर मजा मारून येत असते हे त्याच्या डोक्यात बसले होते. त्यातच त्याने तिला एकदा एका दोनदा त्या तरूणासोबत गाडीवरून जाताना पाहिले होते. त्यामुळे त्याचा संशय पक्का झाला होता. त्याने तिला दुसऱ्या तरूणासोबत गाडीवरून फिरताना आपल्या डोळ्यांनी पाहिले असल्याने त्याचे डोके सणकले होते. त्यावेळी घरी आल्यावर दोघांची मोठी भांडणे झाली होती. या भांडणात त्याने तिला जबर मारहाण केली असल्याने रागाच्या भरात शिवाक्का ही आपल्या दोन्ही लहान मुलांना घेऊन गावातील आपल्या वडिलांच्या घरी गेली. त्यानंतर बसवराज याने आपल्या मुलीला सोबत घेऊन तो बंगळुरूला परत कामासाठी गेला. तेथे त्याने महिना दोन महिने कसे तरी काम केले. परंतु त्याच्या डोक्यातून पत्नीचा विषय काही जाईना म्हणून तो गेल्या आठवडयातच मुलगीला बंगळुरू मध्ये ठेवून गोवनकोप्पला आला. दोन दिवस गावात तो कसा बसा राहिला. या दोन दिवसात त्याने दिवस रात्र फुल्ल दारू प्यायली. आपली पत्नी माहेरी राहते म्हणजे तिला आता तिच्या यारासोबत मजा मारायला संधी मिळत आहे. तिला आता विचारणारे कुणी नाहीत तिच्या माहेरचे लोक तिला समजावण्या आधी आपल्यावरच दोष ठेवत आपल्यालाच नावे ठेवतात त्यामुळे तिला आणि तिच्या माहेरच्या लोकांना चांगला धडा शिकवायला पाहिजे असा त्याने विचार केला. त्यातच बसवराज याच्या मित्रांनी त्याला त्याच्या पत्नी विषयी तेल मीठ लावून सांगितले असल्याने त्याच्या डोक्यातील संशयाचा किडा काही केल्या जात नव्हता.आता याचा सोक्ष मोक्ष लावायचा हे त्याने मनात पक्के ठरविले. आधीच त्याने पत्नीला दुसऱ्या बरोबर फिरताना बघितले असल्याने त्याचे डोक जाम सणकले.त्याच्या डोक्यातून काही केल्या तिचा विषय जात नव्हता. तो झोपला तरी त्याच्या त्याच्या बंद डोळ्यात त्याला पत्नी शिवाक्का ही अजून ही त्या तरूणासोबत गाडीवरून फिरत असल्याचे दिसत होते. शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी त्याने सकाळपासूनच फुल्ल दारू प्यायली होती. संध्याकाळी दारूच्या नशेतच तो पत्नीच्या माहेरच्या घरात पोहचला. त्याला दारूच्या नशेत घराकडे आल्याचे बघून पत्नी शिवाक्काने त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत त्याच्यावर तोंड सुख घ्यायला सुरूवात केली. त्यावेळी दोघात भांडणे सुरू झाली.तो ही तिला शिव्या देत तु तुझ्या यारासोबत झोप जा. माझ्या बरोबर कशाला झोपतेस असे म्हटले याचा राग शिवाक्काच्या वडिल आणि भावाला आला. ते दोघे ही त्याला मारायला त्याच्या अंगावर धावुन आले. अगोदरच बसवराज याला पत्नी शिवाक्काचा राग आला असल्याने त्यांना मागे सारत पत्नी शिवाक्काच्या केसाला धरून घरातून ओढत बाहेर काढले. बाहेर अंगणात तो तिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण करू लागला. आपल्या पत्नीला तो मारहाण करीत होता. परंतु इकडे शिवाक्काच्या वडिलांना आणि भावाला ते सहन झाले नाही. त्यांनी बसवराज याला अडविण्याचा प्रयत्न केला. ते त्याच्या अंगावर काठी घेऊन धावले. परंतु रागाच्या भरात असणाऱ्या बसवराज याने त्याच काठीने आपल्या सासऱ्यांना मारहाण करीत त्यांना जबर जखमी केले. वडिलांना नवरा मारतो आहे हे बघून शिवाक्का ही बसवराज याचे पाय धरून त्याला अडवू लागली. अंगणात बाहेर नुसता तमाशा चालला होता. शेजारचे लोक बघत थांबले होते. बसवराज हा पत्नी शिवाक्काला अर्वाच्च भाषेत शिव्या देत तिला काठीने मारत असताना त्याने काठी बाजुला टाकली आणि जवळज पडलेला मोठा दगड उचलला आणि खाली पडलेल्या शिवाक्काच्या डोक्यात जोरात हाणला. त्या सरशी शिवाक्काच्या डोक्यातून मोठी रक्ताची चिळकांडी उडाली. ती जमिनीवर लोळू लागली. तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. शिवाक्काचा जागीच मृत्यु झाला. या घटनेने बघणारे ही आवाक झाले. गावात खून झाल्याचे बघून अनेकजण घटनास्थळी आले. तोपर्यंत कुणी तरी या घटनेची माहिती दोड्डवाड पोलीसांना दिली. दोड्डवाड पोलीस आणि बैलहोंगल पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत या घटनेची माहिती घेतली. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात शिवाक्का जोडहळळी हिचा मृतदेह पडला होता, तर बाजुलाच रक्ताने माखलेला दगड आणि काठी ही पडली होती. बाजुलाच मयत शिवाक्काचे जखमी वडिल बसलेले होते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी दोड्डवाड येथील सरकारी प्राथमिक रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलिसांनी मयत शिवाक्काचे वडिल आणि भावाकडून घेतली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांना ही घटना नेमकी कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती मिळालेली होती. घटनेनंतर संशयीत बसवराज जोडहळळी हा घटनास्थळावरून पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान रात्री उशिरा दोड्डवाड पोलीसांनी त्याला बैलहोंगल येथून एका दारूच्या आड्डयावरून ताब्यात घेतले. त्याला दोड्डवाड पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता सुरूवातीला तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपल्या खाकीचा प्रसाद दाखविल्यावर तो पोपटासारखा बोलु लागला. त्याने पत्नी शिवाक्का हिचा चारित्र्याच्या संशयातून खून केल्याचे पोलीसांना सांगितले. आपली पत्नी मी बंगळुरू येथे कामाला असताना गावात तिचे एका तरूणासोबत प्रेमसंबंध जुळाले होते. तसेच तिला त्या तरूणासोबत आपण गाडीवरून फिरताना पाहिले असल्याने चिडून भांडणात तिच्या डोक्यात दगड घालून तिचा खून केल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा मान्य केल्यावर दोड्डवाड पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत शिवाक्का हिच्या वडिलाकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शिवाक्का बसवराज जोडहळळी (वय ३२) रा.गोवनकोप्पला तालुका बैलहोंगल जिल्हा बेळगावी हिच्या खुन प्रकरणी तिचा नवरा बसवराज जोडहळळी (वय ३५) रा.गोवनकोप्पला तालुका बैलहोंगल जिल्हा बेळगावी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

पोलीसांनी त्याला बैलहोंगल येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने बसवराज जोडहळळी याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. दरम्यान पोलीसांनी घटनास्थळावरून रक्ताने माखलेला दगड आणि काठी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास दोड्डवाड पोलीस करीत आहेत. प्रेम विवाह केला तरी ही पती पत्नीच्या संसारात विश्वास महत्वाचा असतो त्या विश्वासाला एकदा का तडा गेला की संसाराला ही तडा जातो त्यातूनच मग अशा खूनाच्या घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

## विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड ...

याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, या संकुलातील आरती पांडुरंग कोल्ले यांनी एम.ए. एज्युकेशनमध्ये विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर प्रितेश अशोक गुरमे हा विद्यार्थी विद्यापीठात तिसरा आला असून धाराशिव जिल्ह्यात ते शिक्षक म्हणून नुकतेच रूजू झाले आहेत, हे येथील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आरती कोल्ले यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक समन्वयक अश्विनी केंद्रे यांनी केले. यावेळी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेती टिकली तर माणूस टिकेल ...

व्यवस्थित रित्या प्रक्रिया उद्योग केल्यास चांगल्या प्रकारे पैसे मिळू शकतात. आपल्या कडे असलेल्या कमी जागेत जास्त उत्पन्न घेऊन त्या माळावर प्रक्रिया करून त्या मालाला चांगले पॅकिंग केल्यास त्याला जास्त मागणी आहे.शेतीत तयार होणाऱ्या मालाला कमी भाव मिळतो परंतु प्रक्रया केलेल्या मालाला चांगला भाव मिळतो. प्रक्रिया करताना त्याचे मापदंड पाळणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन व्हाइसचेअरमन समीर पाटील आणि मनोज वर्तक यांनी केले तर आभार सचिव हरेश्वर राऊत यांनी मानले.

## ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर ...

सत्यवती चेवले, उद्धव तेलंगे, ऋषिकेश राजे, शितलताई मालू, गोपाळ वांगे, निर्मलाताई कांबळे, सुरज जाधव, संजय गिर, पवन आल्टे, उदय देशपांडे, राहूल भूतडा, उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष दयानंद जाधव आदींचा समावेश होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक अजित पाटील कव्हेकर यांनी केले, सुत्रसंचालन अब्दुल गालिब शेख यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य लक्ष्मीकांत गौड यांनी केले. कार्यक्रमाला विविध शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.आमदार अभिमन्यू पवार पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा सर्वांगीण विकास होत असून महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. लातूर-मुंबई महामार्गामुळे प्रवास सुलभ होणार असून लातूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासालाही चालना मिळत आहे. लातूर एअरपोर्टच्या विकासासाठी १०० कोटींची तरतूद करण्यात आली असून आगामी काळात जिल्ह्याच्या प्रगतीला अधिक गती मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. देवाभाऊमुळे विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला नवे रूप ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष, अजित पाटील कव्हेकर व नगरसेविका आदिती पाटील कव्हेकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला हा जॉब महाएक्स्पो समाजोपयोगी उपक्रम आहे. शिक्षण व अनुभवाच्या बळावर समाजासाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या योगदानामुळे पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरालाही नवे रूप प्राप्त झाले आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर यांनी केले.

## मनोर आणि विक्रमगड बाजारपेठेतून...

तांत्रिक बिघाड: 'वाहन' पोर्टलवर रिक्षा (Auto-rickshaw) या श्रेणीसाठी कर भरण्याचा पर्याय उपलब्ध नसल्याने ऑनलाइन पेमेंट होत नाही. बॉर्डर चेक पोस्टवर मॅन्युअल पद्धतीने टॅक्स भरण्याची सोय बंद झाल्यामुळे चालक अडचणीत आले आहेत. ऑनलाइन प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत चेक पोस्टवर तात्पुरती मॅन्युअल कर संकलन प्रक्रिया पुन्हा सुरू करावी आणि डिजिटल पोर्टलवरील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी विनंती त्यांनी गडकरींना केली आहे. खा.डॉ.हेमंत सवरा यांनी या दोन्ही विषयांवर सकारात्मक निर्णय घेऊन पालघरच्या जनतेला दिलासा देण्याची विनंती केली आहे.

## कवी सखाराम डाखोरे यांच्या ...

सुप्रसिद्ध साहित्यिक लक्ष्मण माने यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. हूलबिगूल' हा कवितासंग्रह सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे तर्फे १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित झाला होता. या संग्रहाला सुप्रसिद्ध विचारवंत प्रभू राजगडकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली असून, सरदार जाधव यांनी आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. प्रकाशक गीतेश शिंदे यांनीही संग्रहाच्या प्रकाशनासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. या संग्रहातील कविता आदिवासी समाजाच्या जीवनानुभवांना अभिव्यक्त करताना बहुजन समाज आणि विविध सामाजिक चळवळींच्या सद्यस्थितीवरही प्रभावी भाष्य करतात. हूल' म्हणजे विद्रोह, तर बिगूल' हे युद्धाच्या प्रारंभी वाजविले जाणारे रणवाद्य; या अर्थच्छटांमधून अन्याय, अत्याचार आणि जुलूमाविरुद्ध उभारलेल्या संघर्षाचा आणि मानवतेच्या उभारणीचा संदेश सूचित होतो. प्रा.सखाराम डाखोरे हे वसई येथील अण्णासाहेब वर्तक पदवी महाविद्यालयात मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य आहेत. त्यांच्या कवितासंग्रहाला प्राप्त झालेल्या या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल साहित्यवर्तुळातून तसेच शैक्षणिक क्षेत्रामधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## समाजाने एकत्र येऊन हक्क ...

अनेक राज्यातील महापालिकांमध्ये मेहतर वाल्मिकी समाजातील विविध प्रश्नांवर आवाज उचलण्यासाठी प्रतिनिधीत्व करण्यासाठी समाजातील एकही मान्यवर नाही त्यासाठी समाजाने एकत्र येऊन हक्क अधिकारासाठी रस्त्यावर उतरून लढवावी लागेल असे यावेळी सांगितले. याप्रसंगी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आली तसेच माजीआमदार मोहनदादा जोशी यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## वाडा तालुक्यात गॅसचा काळाबाजार ...

मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुप्त माहितीच्या आधारे मुसारणे येथे छापा टाकला. या कारवाईत घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस इलेक्ट्रिक मोटरच्या सहाय्याने व्यावसायिक सिलेंडरमध्ये भरून अवाजवी दराने विक्री केली जात असल्याचे समोर आले. तपासादरम्यान ५ किलो व १४ किलो क्षमतेच्या घरगुती सिलेंडरचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर गॅस भरण्याचा प्रकार सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

कारवाईत १४ किलोचे ९१ आणि ५ किलोचे ७५ रिकामे घरगुती सिलेंडर, व्यावसायिक सिलेंडर, ३ इलेक्ट्रिक मोटर तसेच ६ वजन काटे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी घटनास्थळी आढळून आलेले धनराज माखणे, कैलास राठोड आणि प्रवीण पवार या कामगारांना ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत त्यांनी देवा पवार हा या बेकायदेशीर व्यवसायाचा मुख्य सूत्रधार असल्याची माहिती दिली. संबंधित व्यक्ती त्यांना दरमहा सुमारे १५ हजार रुपये मानधन देऊन गॅस भरण्याचे काम करून घेत असल्याचेही उघड झाले. ही कारवाई संतोष शेळके यांच्या मालकीच्या जागेत सुरू असलेल्या बेकायदेशीर गॅस व्यवसायावर करण्यात आली. या प्रकरणी वाडा पोलीस ठाणे येथे अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच तरल पेट्रोलियम गॅस (LPG) आदेश २००० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहय्यक पोलीस निरीक्षक भगवंत चौधरी करत आहेत.

# ९ दिवसांच्या खडाजंगीनंतर वसई-विरार महापालिकेच्या अर्थसंकल्पाला मंजुरी

## पारदर्शकतेचा नवा आदर्श अन् विकासाचा पाटील पॅटर्न



**विरार : वार्ताहर**

विरार : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पासह २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाला अखेर नऊ दिवसांच्या विलंबानंतर सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. १६ मार्च रोजी महासभेत सादर करण्यात आलेल्या या अर्थसंकल्पावर विरोधकांच्या तीव्र आक्षेपांमुळे तातडीने निर्णय होऊ शकला नव्हता. २० मार्च रोजी या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा घेण्यात आली. मात्र सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये झालेल्या खडाजंगीमुळे निर्णय लांबणीवर पडला. अखेर २५ मार्च रोजी पुन्हा सर्वसाधारण सभेपुढे हा विषय मांडण्यात आला. दिवसभर चाललेल्या चर्चेनंतर अंदाजपत्रकातील विविध तरतुदींवर नगरसेवकांनी आपापली मते मांडली. बुधवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेली सभा सायंकाळी ७ वाजेपर्यंत चालली. या कालावधीत विविध विकासकामे, योजनांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींवर चर्चा झाली. अखेरीस सर्वांच्या संमतीने २०२५-२६च्या सुधारित अर्थसंकल्पासह २०२६-२७च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली. नऊ दिवस चाललेल्या या प्रक्रियेनंतर अखेर अर्थसंकल्पाला हिरवा कंदील मिळाल्याने महापालिकेच्या विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वसई-विरार महापालिकेची अर्थसंकल्पावरील विशेष महासभा २५ मार्च रोजी पार पडली असून, या सभेत महापौर अजीव पाटील यांनी मांडलेल्या सूचनांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महापौर पदाची धुरा सांभाळल्यापासून स्वतःचे मानधन आणि वाहन भत्ता नाकारून एक नवा आदर्श प्रस्थापित करणाऱ्या अजीव पाटील यांनी या अर्थसंकल्पीय भाषणातही केवळ आकडेवारीवर न थांबता सामान्य वसई-विरारकरांच्या रोजच्या जगण्याशी निगडित प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रशासकीय कामाची सूक्ष्म जाण आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी त्यांच्या प्रत्येक मुद्यातून अधोरेखित झाली.

शहराच्या विकासासाठी केवळ निधी खर्च करणे पुरेसे नसून, पालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रशासनाने मांडलेली 'रिव्हर्स बिडिंगऋची संकल्पना त्यांनी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींसमोर मांडली. महापौर पाटील यांनी आपल्या भाषणात प्रामुख्याने पालिकेच्या उत्पन्न वाढीवर भर दिला. शहरात मालमत्ता कराच्या नोंदी वाढल्या असून त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना, जसे की अमृत सरोवर आणि तलाव संवर्धन योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान खेचून आणण्यासाठी प्रशासनाने तत्पर राहावे, अशी सूचना त्यांनी केली. नगररचना विभागाला निर्देश देताना त्यांनी स्पष्ट केले की, नवीन इमारतींमध्ये बिल्डरांकडून बसवल्या जाणाऱ्या एसटीपी आणि फायर लिफ्टच्या देखभालीचा खर्च भविष्यात रहिवाशांवर पडू नये, यासाठी विकासकांकडून किमान ५ वर्षांचा देखभाल करार करणे बंधनकारक करावे. आरोग्य व्यवस्थेवर बोलताना त्यांनी नाममात्र शुल्क आकारून केस पेपर काढण्याची सूचना केली, जेणेकरून सुविधेचा गैरवापर थांबेल आणि गरिबांना नगरसेवकांच्या शिफारशीने मोफत उपचार मिळतील. याशिवाय, एकल महिलांना मालमत्ता करात सवलत देणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी तात्पुरता निवारा केंद्र उभारणे आणि दिव्यांग मुलांसाठी पालिका हद्दी मध्ये ईटीसी सेंटर व सायन्स पार्क सुरू करण्यासारख्या अत्यंत संवेदनशील आणि आश्वासक सूचना त्यांनी मांडल्या. अग्निशमन दलाच्या ताफ्यातील जुन्या झालेल्या गाड्या बदलण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याचे सांगतानाच, शहराच्या पाणीप्रश्नावर खडकोली धरणाची दुरुस्ती हा महत्त्वाचा पर्याय त्यांनी सुचविला. भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्र उभारण्यापासून ते पालिकेच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण बदलांपर्यंत त्यांनी अनेक पैलुंना स्पर्श केला. प्रशासकीय खर्चात कपात आणि उत्पन्नात वाढ हे सूत्र मांडताना त्यांनी रिव्हर्स बिडिंगचा यशस्वी प्रयोग मांडला, त्यातून पालिकेच्या तिजोरीत कोट्यवधींची भर पडेल असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या या सर्व सूचनांमुळे आगामी काळात वसई-विरारच्या विकासाचा चेहरामोहरा बदलण्याची चिन्हे असून, प्रशासकीय प्रगल्भतेसोबतच महापौर अजीव पाटील यांचा सर्वसामान्यांशी असलेला जिव्हाळा या अर्थसंकल्पीय सभेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

**रिव्हर्स बिडिंग पारदर्शकतेतून कोट्यवधींची कमाई!**

जाहिरात आणि बाजार विभागातील ठेकेदारी पद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी रिव्हर्स बिडिंग करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या प्रक्रियेत सर्वात जास्त बोली लावणाऱ्या रकमेला बेस प्राईस मानून ऑनलाईन लिलाव पुकारला जातो. या प्रक्रियेची माहिती सभागृहातील लोकप्रतिनिधींना मिळावी, यासाठी महापौरांनी अति. आयुक्त दीपक सावंत यांना त्याबाबतची माहिती देण्यास सांगितले. अति. आयुक्त दीपक सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार; रिव्हर्स बिडिंग पद्धतीमुळे प्रभाग समिती १ मध्ये जाहिरातींचा ठेका जिथे १ कोटी २७ लाखांचा होता, तिथे ६० वेळा बोली लागून तो १ कोटी ९९ लाखांवर गेला. या प्रक्रियेमुळे जाहिरात विभागात ४ कोटी ५३ लाखांची तर बाजार लिलावात गेल्या वर्षीच्या ८ कोटींच्या तुलनेत थेट १३ कोटी ५७ लाख रुपयांची विक्रमी वाढ होण्याची अपेक्षा आहे. महापौरांच्या या नियोजनामुळे पालिकेला कोणत्याही अतिरिक्त कराशिवाय केवळ प्रक्रियेत सुधारणा करून कोट्यवधींचे उत्पन्न प्राप्त करता येणार आहे.

# मैत्री फाउंडेशन ने उभारली 'आनंदाची गुढी' १००० आदिवासी कुटुंबांना धान्य वाटप



**वसई : वार्ताहर**

गुढीपाडवा म्हणजेच आपण स्वतः जगून आपल्या सोबत रंजलेल्या, गांजलेल्या जनतेला आनंदाचा सूर्यप्रकाश देऊन त्यांच्याशी एकरूप होणं म्हणजेच पाडवा. अशाच गुढीपाडव्याच्या शुभ दिनी मैत्री फाउंडेशन बोरवलीचे संस्थापक श्री.राजेशभाई त्रिवेदी ह्यांनी जुचंद्र येथील शिव छत्रपती समाज सेवा मंडळाच्या सहकार्याने विक्रमगड व डहाणू तालुक्याच्या दुर्गम भागातील १००० आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून गरीब जनतेच्या समवेत गुढीपाडव्याचा सण खऱ्या अर्थाने साजरा केला. मैत्री फाऊंडेशनचे विश्वस्त संगीता त्रिवेदी, व्रज त्रिवेदी व ऋत्वी जैन यांच्या हस्ते विक्रमगड तालुक्यातील कासपाडा, अलीवपाडा, कलमपाडा, पाटीलपाडा, डोयापाडा, पासोडीपाडा, तळ्याचापाडा तसेच डहाणू तालुक्यातील कांदरवाडी, शहाणपाडा, पाटीलपाडा, कोमपाडा, डोंगरीपाडा येथील १००० आदिवासी कुटुंबांना तांदूळ, आटा, मुगडाळ, तूरडाळ, तेल, मसाला, हळद, साखर, चहापावडर, चणाडाळ, साबण इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात आले. जूचंद्र सेवा मंडळाचे अध्यक्ष किरण म्हात्रे यांनी मैत्री फाउंडेशन बोरवलीचे संस्थापक राजेशभाई त्रिवेदी व परिवाराचे आभार मानले. कार्यक्रमास जूचंद्र सेवा मंडळाचे संस्थापक पुरुषोत्तम पाटील, समर्थ केटरचे वारंगडे उपस्थित होते. मैत्री फाऊंडेशनचे सेवक पियुष पटेल, अंगणवाडी सेविका, जूचंद्र सेवा मंडळाचे मिलिंद पाटील, धर्माजी म्हात्रे, अनिल असारे यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वी झाला.

# महाराष्ट्रातील मच्छिमार संकटात; डिझेलच्या दरात प्रति लिटर २२ रुपयांची वाढ

**वसई : वार्ताहर**



जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे तेल कंपन्यांनी (OMCs) २० मार्च २०२६ पासून 'बल्क/कन्झ्युमर' (Bulk/Consumer) डिझेलच्या दरात प्रचंड वाढ केली आहे. यामुळे महाराष्ट्रातील मासेमारी व्यवसाय पूर्णपणे ठप्प होण्याची भीती अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने व्यक्त केली असून, केंद्र व राज्य सरकारने यात तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी समितीचे युवाध्यक्ष मिल्टन सौदिया यांनी केली आहे. सध्या सामान्य नागरिकांसाठी पेट्रोल पंपावर किरकोळ डिझेलचा दर सुमारे ९०.०३ रुपये प्रति लिटर असताना, मच्छिमार सहकारी संस्थांसाठी हाच दर ११२ रुपयांच्या पुढे गेला आहे. मच्छिमार सहकारी संस्थांना तांत्रिकदृष्ट्या 'बल्क कन्झ्युमर' म्हणून वर्गीकृत केल्यामुळे, मच्छिमारांना किरकोळ दरापेक्षा प्रति लिटर २२ रुपये अतिरिक्त मोजावे लागत आहेत. प्राथमिक क्षेत्रावर लादलेला हा एक प्रकारचा अन्यायकारक 'कर' आहे. हे अत्यंत दुर्दैवी आणि अन्यायकारक आहे की, शहरातील आलिशान गाड्या वापरणाऱ्यांना पंपावर ९० रुपयांनी डिझेल मिळते, मात्र देशाला अन्नसुरक्षा देणाऱ्या कष्टकरी मच्छिमाराला त्याच्या सहकारी संस्थेतून ११२ रुपये दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे. ही केवळ दरवाढ नसून महाराष्ट्रातील ३.६ लाख मच्छिमारांच्या पोटावर लाथ मारण्याचा हा प्रकार आहे, असे सौदिया यांनी म्हटले आहे. सौदिया यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, अशीच परिस्थिती २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धाच्या वेळी ओढवली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्त्याना निवेदन देऊन मच्छिमार आणि शेतकऱ्यांसाठी 'तिसरा प्रवर्ग' तयार करण्याची मागणी केली होती, जेणेकरून प्राथमिक क्षेत्राला औद्योगिक 'बल्क' दरांपासून वेगळे ठेवता येईल. मात्र, त्यावर कायमस्वरूपी धोरणात्मक निर्णय न झाल्याने आज पुन्हा मच्छिमारांवर ही वेळ आली आहे. डहाणू झाईपासून सिंधुदुर्गपर्यंतच्या सर्व किनारी जिल्ह्यांच्या वतीने अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने खालील मागण्या केल्या आहेत.

१) वर्गीकरणात बदल : मच्छिमार सहकारी संस्थांची 'बल्क/इंडस्ट्रियल' श्रेणीतून तातडीने मुक्तता करावी. २) किंमत संरक्षण: प्राथमिक क्षेत्रासाठी (मासेमारी आणि शेती) स्वतंत्र 'तिसरा प्रवर्ग' तयार करून त्यांना 'रिटेल' किंवा 'बल्क' यांपैकी जो दर कमी असेल, त्या दराने डिझेल उपलब्ध करून द्यावे. ३) कृषी दर्जाची अंमलबजावणी: ९ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार मत्स्य व्यवसायाला 'शेतीचा दर्जा' देण्यात आला आहे. त्या धर्तीवर शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांनाही इंधन संरक्षण मिळावे. जर सरकारने ही २२ रुपयांची तफावत तातडीने दूर केली नाही, तर महाराष्ट्रातील मासेमारी व्यवसाय पूर्णपणे बंद होईल. मासळीच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा इंधनाचा खर्चच जास्त होत असेल, तर मच्छिमार समुद्रामध्ये जाऊच शकणार नाहीत, असेही सौदिया यांनी म्हटले आहे.

# टिवरी ते भोयदापाडा आणि बाफाणे ते नायगाव स्टेशन रस्त्यासाठी २६ कोटींची निविदा निघूनही रस्ता कागदावरच!

## वसई-विरार पालिकेच्या ढिम्म कारभाराचा जनतेला फटका

**वसई : वार्ताहर**

वसई पुर्व नायगाव आणि परिसरातील रखडलेल्या रस्त्यांच्या प्रश्नावरून स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून, प्रशासनाच्या ढिम्म कारभाराविरोधात साई दुर्गा मित्र मंडळाने आता आरपारची लढाई पुकारली आहे. टिवरी ते भोयदापाडा आणि बाफाणे ते नायगाव स्टेशन या दोन प्रमुख रस्त्यांची कामे तातडीने सुरू न झाल्यास येत्या १ एप्रिल रोजी महापालिकेवर भव्य धडक मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवार, २३ मार्च रोजी महापालिकेचे उपमहापौर मार्शल लोपीस आणि संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. गेल्या सहा महिन्यांपासून बाफाणे ते नायगाव स्टेशन रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू असून ठेकेदाराकडून केवळ नावापुरते पॅचवर्क केले जात आहे, तर दुसरीकडे टिवरी फाटा ते भोयदापाडा रस्त्यासाठी साधारण २६ कोटी रुपयांची निविदा निघूनही केवळ तांत्रिक सभा आणि कागदी घोडे नाचवले जात असल्याचा आरोप



रहिवाशांनी केला आहे. खराब रस्त्यांमुळे या भागात रोज छोटे-मोठे अपघात होत असून कित्येक नागरिकांना आपले हातपाय गमवावे लागले आहेत. सांडपाणी रस्त्यावर साचल्याने शालेय विद्यार्थी आणि महिला भगिनींना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असून दुचाकी घसरून पडण्याच्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ खोटी आश्वासने आणि दिशाभूल करणारी पत्रे दिली जात असल्याने जनतेचा महापालिकेवरचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे. प्रशासन कदाचित एखाद्या मोठ्या जीवितहानीची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत या दोन्ही रस्त्यांचे काम प्रत्यक्ष जमिनीवर सुरू झालेले नाही. प्रशासनाला जाब विचारण्यासाठी १ एप्रिल रोजी होणाऱ्या मोर्चात सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हा, असे आवाहन साई दुर्गा मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# देऊळवाडी रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**उदगीर : वार्ताहर**

उदगीर तालुक्यातील आदर्श गाव देऊळवाडी येथे श्री समर्थ सद्गुरू धोंडूतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्र्वभूमीवर सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी एकनाथ केदार यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून खुलताबादचे तहसीलदार संतोष गुट्टे, वैजापूरचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे यांची उपस्थिती होती. तसेच देऊळवाडी गावचे सरपंच शुभम केंद्रे व उपसरपंच संतोष केंद्रे यांचीही उपस्थिती होती. कै.त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर यांच्या वतीने आयोजित या शिबिराला ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात एकूण ३९७ रुग्णांची तपासणी, तर ४९ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. शिबिरात डॉ. विजय बिराजदार, डॉ. राधिका बिराजदार, डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. उबेद शेख, डॉ. वसंत बलांडे, डॉ. महादेव मठपती लायन्स क्लबचे वैद्यकीय अधिकारी यांनी नागरिकांची तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराची प्रस्तावना प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष संजय राजुळे यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास केदार यांनी केले.

# वाड्यात खैर तस्करांवर वनविभागाची कारवाई; ६१ ओंडके जप्त



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील अबिटघर गावाच्या जंगलालगत एका खाजगी क्षेत्रामध्ये खैर या दुर्मिळ प्रजातीची अवैध तोड करून सोलीव नगांची वाहतूक करण्याच्या तयारीत असलेल्या तस्करांच्या गुरुवारी वाडा वन विभागाने मुसक्या आवळल्या आहेत. तस्करीसाठी वापरण्यात आलेल्या ३ दुचाकी व तब्बल ६१ खैर लाकडाचे ओंडके वनविभागाला जप्त करण्यात यश आले असून या कारवाईने तस्करांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत असे परिक्षेत्र अधिकारी सिद्धार्थ वाघमारे यांनी सांगितले. अबिटघर गावाजवळ गट नंबर ३१९ च्या लगत असणाऱ्या खाजगी मालकी क्षेत्रात जुनी खदान असून याच भागात खैर वृक्षांच्या तोड करून लाकडाचे सोलीव काम सुरू असल्याची गुप्त माहिती वनविभागाला मिळाली. उप वनसंरक्षक डॉ. सैपुन शेख यांनी तात्काळ याबाबत सहाय्यक वनसंरक्षक वाडा धीरज ढेंबरे यांना सूचना करून त्यांच्या मार्गदर्शनाने वनविभागाने सापळा रचला. वन विभागाने आपल्या चमूसह छापेमारी केली मात्र आरोपींनी मोठ्या शिताफीने डोंगर चढुन पळ काढण्यात यश मिळवले. १.३८० घ.मी. इतका खैर प्रजातीचा माल मात्र हस्तगत करण्यात आला असून तस्करीत वापरलेल्या ३ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. वन विभागाच्या विविध कलमांच्या आधारे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून कारवाईचा पुढील तपास वनविभाग करीत आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करुन कठोर कारवाई केली जाईल असे पूर्व वाडा परिक्षेत्र अधिकारी उत्तम पाटील यांनी सांगितले. वन संपत्तीचे नुकसान करणाऱ्या तस्कारांविरुद्ध वनविभागाची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती नागरिकांनी तात्काळ वनविभागाला द्यावी असे आवाहन जव्हार वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. सैपुन शेख यांनी केले आहे.

# वाडा-मनोर महामार्गावर ट्रक आणि बसची समोरासमोर धडक



**वाडा : वार्ताहर**

वाडा-मनोर महामार्गावरील सपना फाटा येथे बुधवारी सकाळच्या सुमारास खाजगी बस व ट्रक यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तिघेजण जखमी झाले आहेत. जखमींवर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कंचाड येथून वाड्याकडे येणारी खाजगी बस आणि वाड्याकडून मनोरच्या दिशेने जाणारा ट्रक यांची सपना फाटा येथील वळणावर समोरासमोर धडक झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की दोन्ही वाहने रस्त्याच्या मधोमध अडकून पडली, त्यामुळे वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. या घटनेमुळे सुमारे तीन ते चार तास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे महामार्गावरील इतर वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या अपघातात खाजगी बस चालक सद्दाम हुसेन, त्याचा सहकारी शरद भोगले आणि ट्रक चालक गोविंद कुमार हे तिघेजण जखमी झाले असून त्यांच्यावर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, ट्रक चालकाने दिलेल्या माहितीनुसार, ट्रकचे स्टेअरिंग अचानक जाम झाल्याने हा अपघात घडल्याचे सांगितले जात आहे.

# माजी नगरसेवक किशोर वानवारी यांच्या माध्यमातून अष्टमी सण उत्साहात साजरा

**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगर शहरात माजी नगरसेवक किशोर वानवारी यांनी अष्टमीचा सण मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावाने साजरा केला. वानवारी यांच्या निवासस्थानी महाप्रसाद भंडाराचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये शेकडो नागरिकांनी सहभागी होऊन प्रसाद ग्रहण केला. दुर्गा देवीला समर्पित असलेला अष्टमीचा सण धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. किशोर वानवारी दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मोठ्या भक्तीभावाने वसंत आणि शारदीय नवरात्र साजरी करतात आणि या काळात विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. यामध्ये अन्नदान, मोफत आरोग्य शिबिरे आणि तरुण मुलींना




उपयुक्त वस्तूंचे वाटप यांचा समावेश आहे. या वर्षीच्या अष्टमी उत्सवात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये आमदार कुमार आयलानी, उपमहापौर अमर लुंड, भाजप जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया, शिवसेना शिंदे गट उल्हासनगर महानगरप्रमुख राजेंद्र चौधरी, शिवसेना गटनेते अरुण आशान, उद्योगपती सुमित चक्रवर्ती, समाजसेवक राजा गेमनानी, प्रकाश माखिजा, नगरसेवक आकाश चक्रवर्ती, प्रधान पाटील यांच्यासह अनेक अधिकारी, महाराज, कामगारांचा समावेश होता. सालाबादाप्रमाणे ह्यावर्षी सुद्धा शहरातील अनेक मान्यवर येऊन माताराणीच्या आशीर्वादाचा लाभ घेत असतात. या धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून किशोर वानवारी यांचे या भागातील योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, त्यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल निवडणूक वसई कोर्टात शांततेत पार पडली

## १५५ उमेदवारांचे नशीब मतपेटीत बंद



**वसई : वार्ताहर**

महाराष्ट्र गोवा बार कौन्सिल निवडणूक महाराष्ट्र गोवा राज्यात मागील आठवड्यात घेण्यात आली. निवडणूक वसई कोर्टात मतदारांनी मतदान मोठ्या आनंदाने व उत्साहात केले. निवडणूक अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे निवडणूक प्रक्रिया राबवली. संपूर्ण महाराष्ट्रात शांततापणे निवडणूक झाली. महाराष्ट्र गोवा बार कौन्सिल निवडणुकीत उमेदवाराचे नशीब मत पेट्यांमध्ये बंद झाली. मुख्य कार्यालय मुंबई हायकोर्ट येथून पुढील सात दिवसानंतर मतमोजणी होईल. अधिकृत निवडून आलेल्या उमेदवाराची घोषणा करते. संपूर्ण महाराष्ट्र व गोवा राज्यातील वकील व नागरिकांचे लक्ष वेधणाऱ्या या निवडणुकीत अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडेल याची उत्सुकता लागली आहे.

संपूर्ण महाराष्ट्र व गोवा राज्यात २४ मार्च २०२६ रोजी ही निवडणूक घेण्यात आली. यात महाराष्ट्र व गोव्यातील ३३४ मतदार केंद्रावर मतदान करण्यात आले. यातील मतदान केंद्र क्रमांक ३०४ हा वसई कोर्टातील मतदार केंद्रावर एकूण मतदाराची संख्या २३६३ होती. या निवडणुकीत वसई तालुक्यातील वकील जिमी घोन्सालवीस यांनी महाराष्ट्र गोवा बार कौन्सिल निवडणुकीत उमेदवारी घेऊन आपले नशीब आजमावत आहेत. वसई कोर्टातून ९६७ लोकांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ४०.९२% टक्के मतदान झाल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. कोर्टाचे दैनंदिनी काम सुरू असतानाही मतदाराने वेळात वेळ काढून आपल्या मतदानाचा हक्क बजावला. मतदान वकील बाथरूम मध्ये सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत मतदान करण्यात आले. निवडणुकीसाठी नेमलेल्या निवडणूक अधिकारी व बीएलओ तसेच वसई पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या चोख बंदोबस्तात वसई कोर्टात ही निवडणूक शांततेत पार पडली. उमेदवारांनी महाराष्ट्र व गोवा या राज्यातील वेगवेगळ्या कोर्टात निवडलेल्या आपापले प्रतिनिधींनी मतदान करण्यासाठी आलेल्या मतदाराला मतदान प्रक्रियेबद्दल समजावून सांगण्यास मदत केली. ही मतदान प्रक्रिया बॅलेट पेपरवर घेण्यात आली. या निवडणुकीचा निकाल पुढील ७ दिवसानंतर मुख्य कार्यालय मुंबई हायकोर्ट येथून घोषित करण्यात येईल.



# विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून हाडाचा शिक्षक बना–प्रा.रमेश भारती

**लातूर : वार्ताहर**

एक हाडाचा शिक्षक म्हणजे एखादी पिढी घडवताना तो स्वतः घडत असतो. आपल्या सोबत आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीमध्ये बदल घडावा यासाठी शिक्षक आग्रही असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून हाडाचे शिक्षक बना, असा सल्ला कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक प्रा. रमेश भारती यांनी केले. येथील राजमाता जिजामाता बी.एड. महाविद्यालयात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि टेट परीक्षेसह विविध परीक्षेविषयी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, प्रा. शरद दाणी यांची विशेष उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी.एन. केंद्रे होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के.ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, संचालक स्वाती केंद्रे, शैक्षणिक समन्वयक वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्रा.बरुण करदुरे, डॉ.नाजनीन सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिक्षणाधिकारी क्षीरसागर म्हणाले, यशाला शॉर्टकट नसतो. कुठलीही गोष्ट सहज मिळत नाही. यासाठी जिद्द, ध्येय ठेवा, हमखास यश मिळेल. नोकरी हे साध्य नाही तर साधन आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणासह स्पर्धा परीक्षेची कास धरा, असा सल्ला त्यांनी दिला. गुणवत्तापूर्ण शिक्षणातूनच गुणवंत शिक्षक घडतात, असे प्रा. भारती म्हणाले. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते, असे सांगत त्यांनी संकुलाचे कौतुक केले. यावेळी प्रा.दाणी यांनी कुठली पुस्तके वाचावीत, वेळेचे नियोजन, प्रश्नपत्रिका कशी सोडवावी, ...पान ६ वर

# शेती टिकली तर माणूस टिकेल –डॉ.भरत कुशारे



**वसई : वार्ताहर**

आजच्या काळात मजुरांचे वाढलेले भाव,कमी होत चाललेली शेती यामुळे आता लोक शेती करतील का? असा प्रश्न पडत आहे. शेती टिकली तरच माणूस टिकेल. वसई सारख्या ठिकाणी वाढत्या शहरीकरणात हि येथील शेतकऱ्यांना शेती करावीशी वाटते, हे महत्वाचे आहे. असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र कोसबाड येथिक कृषी शास्त्रज्ञ डॉ. भरत कुशारे यांनी वसई देवतलाव येथील वसई शेतकरी सोसायटीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना केले. वसई शेतकरी सोसायटी तर्फ काल संध्याकाळी शेतकऱ्यांसाठी कडधान्य लागवड व प्रक्रिया उदयोग या विषयावर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांसाठी कडधान्य लागवड व प्रक्रिया उदयोग हया विषयावर डॉ. भरत कुशारे, कृषी शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र कोसबाड डहाणू व रूपाली देशमुख, कृषी तज्ञ, कृषी विज्ञान केंद्र कोसबाड डहाणू यांचे प्रक्रिया उद्योग यावर शेती मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे चेअरमन आशय राऊत यांनी प्रास्ताविकात तकरी सोसायटीच्या वाटचालीचा आढावा उपस्थित समोर मांडला. यात त्यांनी सोसायटी तर्फे शेतकऱ्यांच्या शेती विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले कि आपल्याकडे शेती कमी होऊ लागली आहे. त्यामुळे कमी जागेत जास्त उत्पन्न मिळणाऱ्या पिकांचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी सोसायटी वेगवेगळे मार्गदर्शन कार्यक्रम राबवत आली आहे. या कार्यक्रमात कोसबाड कृषी केंद्राचे डॉ. भरत कोषारी यांनी कडधान्य लागवडीवर शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती दिली. यात त्यांनी हरभरा आणि वाल या धन्याची लागवड कशी करावी. त्याचे पाण्याचे नियोजन,खताचे प्रमाण याबाबत माहिती देतंच सांगितले कि, शेतात दुबार पिके घेतल्याने शेतीचा पॉट वाढतो. आता पर्यंत आपण फक्त भट पीक शेतात घेत होतो. सतत एकच पीक घेतल्याने शेतीचा पॉट कमी होतो त्यासाठी दुबार पीक घेणे महत्वाचे असल्याचे सांगितले. आता पारंपरिक शेतीला सुधारित तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती करायला हवी असे सांगितले. तर रुपाली देशमुख यांनी प्रक्रिया उद्योग बाबत माहिती देताना सांगितले कि, आजच्या काळात ...पान ६ वर

# ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर यांच्या कृपा-आशीर्वादाने ‘देवाभाऊ जॉब महाएक्स्पो २०२६’ यशस्वी –आ.अभिमन्यू पवार



**लातूर : वार्ताहर**

लातूर जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘देवाभाऊ जॉब महाएक्स्पो २०२६’ ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून हा मेळावा ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर यांच्या कृपा-आशीर्वादाने यशस्वी ठरला, असे प्रतिपादन औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. युवा नेते अजित पाटील कव्हेकर व नगरसेविका आदिती पाटील कव्हेकर यांनी जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले. दोन वर्षांपूर्वीही आयोजित करण्यात आलेल्या जॉब महाएक्स्पोला मिळालेल्या प्रतिसादानंतर यंदाच्या मेळाव्यानेही यशाची नवी उंची गाठली. राज्यात आजपर्यंत ५८२ रोजगार मेळावे झाले असून, लातूरातील हा ५८३ वा ऐतिहासिक मेळावा ठरला आहे. पुढील ५८४ वा रोजगार मेळावा औसा मतदारसंघात घेण्याचा मानसही यावेळी व्यक्त करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर पंढरपूर देवस्थानचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपा नेते गणेश हाके, जयक्रांती कॉलेजचे प्राचार्य प्रशांत घार, प्राचार्य लक्ष्मीकांत गौड, बाळासाहेब शिंदे, नगरसेवक गिरीष पाटील, रागिणीताई यादव, अप्पासाहेब पाटील, रविशंकर जाधव, दीपक मठपती, अनिरूध्द पाटील, विनोद जाधव, बापूसाहेब गोरे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश यादव, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, किशोरदादा घार, अनंत गायकवाड, पुणे येथील शाम लांडे, प्राचार्य संदीप पांचाळ, अरूणाताई कांदे, स्वातीताई घोरपडे, संगिताताई मिरजे, ज्योतीताई आवस्कर, विजय जाकते, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, राजर्षीताई धोत्रे, ...पान ६ वर

# मनोर आणि विक्रमगड बाजारपेठेतून जाणाऱ्या महामार्गाचे फेरसर्वेक्षण करा –खा.डॉ.हेमंत सवरा



**वाडा : वार्ताहर**

पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन जिल्ह्यातील दोन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर लक्ष वेधले आहे. यामध्ये NH-160A महामार्गाचे फेर-संरेखन आणि पालघर सीमाभागातील रिक्षाचालकांना भेडसावणाऱ्या तांत्रिक अडचणींचा समावेश आहे. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी NH-160A महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत चिंता व्यक्त केली आहे. सध्याच्या आराखड्यांनुसार, हा महामार्ग मनोर आणि विक्रमगड गावांच्या दाट लोकवस्तीतून जात असल्याने या मार्गामुळे अनेक निवासी घरे, व्यावसायिक दुकाने, सामाजिक पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक महत्त्वाची ठिकाणे जमीनदोस्त होण्याची शक्यता आहे. स्थानिक रहिवाशांचे विस्थापन टाळण्यासाठी सध्याचे संरेखन बदलून लोकवस्तीबाहेरून नवीन मार्ग (Diversion) काढण्यात यावा, अशी मागणी खासदारांनी केली आहे. या बदलामुळे केवळ लोकवस्ती वाचणार नाही, तर ग्रामीण आणि आदिवासी भागांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल आणि प्रकल्पाचे काम कोणत्याही सामाजिक अडथळ्याशिवाय पूर्ण होईल. दुसऱ्या पत्राद्वारे, खासदारांनी तलासरी आणि डहाणू तालुक्यातील रिक्षाचालकांच्या व्यथा मांडल्या आहेत. पालघरचा हा भाग दमण, दादरा आणि नगर हवेली आणि सिल्वासा यांच्याशी जोडलेला असून, नागरिक दैनंदिन कामासाठी व वैद्यकीय गरजांसाठी रिक्षांवर अवलंबून आहेत. ...पान ६ वर

# राम नवमी निमित्त वाड्यात भव्य शोभायात्रा



**वाडा : वार्ताहर**

राम नवमीच्या पावन पर्वानिमित्त वाडा शहरात गुरुवारी सायंकाळी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. सकल हिंदू समाज, वाडा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शोभायात्रेची सुरुवात खंडेश्वरी नाका येथून झाली. मुख्य बाजारपेठ मार्गे ही यात्रा परळी नाका येथे विसर्जित करण्यात आली. शोभायात्रेदरम्यान जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे आकर्षक राम रथ तसेच अघोरी तांडव सादरीकरण होते. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि विविध देखावे यामुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले होते. यावेळी मोठ्या संख्येने महिला, पुरुष, युवक तसेच लहान मुलांनी सहभाग घेतला. पोलिस प्रशासनाच्या देखरेखीखाली कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडला. हिंदू संस्कृतीचा वारसा जपत एकत्रितपणे सण साजरा करण्याचा संदेश या शोभायात्रेतून देण्यात आला.

# सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न




**वाडा : वार्ताहर**

भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुका शाखेच्या वतीने कुडूस येथील बुद्ध विहारात चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुक्याचे विद्यमान अध्यक्ष विनोद वाघचौरे गुरुजी यांनी भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात पालघर जिल्हा व तालुका महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आदर्शाच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच त्रिसरण पंचशील ग्रहण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना बौद्ध धम्म, सम्राट अशोकांचे कार्य आणि सामाजिक ऐक्य याविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी पालघर जिल्हा संस्कार उपाध्यक्ष व केंद्रीय शिक्षक प्रकाश जाधव गुरुजी, महिला संघटक मंदाताई कांबळे, बौद्धाचार्य सुजय जाधव गुरुजी, केंद्रीय शिक्षिका रश्मीताई भोईर, तालुका सरचिटणीस नरेश जाधव, उपाध्यक्ष मोहन जाधव, महिला उपाध्यक्षा अपर्णाताई गवळी, महिला संरक्षण सचिव निशाताई वाघचौरे, आम्रपाली ताई गमरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन भोईर, नरेंद्र मोरे, भागवत निकम, रमेश थुळे तसेच बोधीवृक्ष छाया मंडळ व रमाई महिला मंडळातील पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व मान्यवरांचे तालुका शाखेच्या वतीने स्वागत करण्यात आले. उपस्थितांना फरसाणचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता त्रिसरण घेऊन करण्यात आली.

# कवी सखाराम डाखोरे यांच्या ‘हूलबिगूल’चा राज्यस्तरीय सन्मान

**वसई : वार्ताहर**






वसई येथील कवी प्रा. सखाराम डाखोरे यांच्या ‘हूलबिगूल’ या कवितासंग्रहाला सन २०२६ साठी नारायणे स्मृती प्रतिष्ठान, वर्धा यांचा मारोतराव नारायणे स्मृती उत्कृष्ट राज्यस्तरीय कवितासंग्रह पुरस्कार’ जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद नारायणे यांनी बुधवारी (दि. २५) या पुरस्काराची घोषणा केली. या पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम यांचा समावेश असून, पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी वर्धा येथील बजाज सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. ...पान ६ वर

# समाजाला एकत्र येऊन हक्क अधिकारासाठी रस्त्यावर उतरून लढावे लागेल –डॉ.अनुपम बेगी



**पुणे : शंकर जोग**

मेहतर वाल्मिकी समाज, रुखी समाज आणि सफाई मजदूर यांची प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची बैठक कॅम्प येथील वीर गोगादेव समाज मंदिर स्वर्गीय वसंतराव चव्हाण मेमोरियल हॉलमध्ये आयोजित बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे माजी आमदार महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मोहन दादा जोशी, या बैठकीच्या आयोजक अखिल भारतीय मजदूर कॉंग्रेस संस्थापक अध्यक्ष डॉ.अनुपम बेगी, कविराज संघेलिया, मनोज लालबिगे, परविन लालबिगे, सतीश लालबिगे, रवी भिंगानिया, यश चव्हाण, भारत जाधव, गोपाल सोलंकी, जीवन द्याल, महेंद्र चव्हाण, विपुल उमंदे, अमृतपाल डिक्की, शारदा सोडी, किशोर भगत, सौरभ वाल्मिकी, मंथन म्हेत्रे, सूर्यकांत यादव, विलास मकवाणी, गीता ननावरे,नितीन प्रसाद, रवी भोंगळे, मनोज तूसंबड, आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी डॉ अनुपम बेगी यांनी सांगितले केंद्रामध्ये, महाराष्ट्रात, तसेच ...पान ६ वर

# वाडा तालुक्यात गॅसचा काळाबाजार उघड



**वाडा : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात घरगुती गॅसचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, राज्यस्तरीय दक्षता पथकाच्या धडक कारवाईत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, ...पान ६ वर